www.rajdand.com
सातारा/पुणे, शनिवार
03.02.2024
पृष्ठ : ४ | मुल्य : ४ | माघ कृ १३
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

# राज्यात ५५१ टँकरनी पाणीपुरवठा

## गतवर्षीच्या तुलनेत यंदा भीषण चित्र, दीड हजार गावांमध्ये टंचाई

**मुंबई : गेल्या वषी कमी पाऊस झाल्याने यंदा फेब्रुवारीच्या सुरुवातीलाच पाणीटंचाईची समस्या भेडसावू लागली आहे. ग्रामीण भागात टँकरच्या मागणीत वाढ झाली आहे. त्यातच धरणातील पाणीसाठा कमी होत आहे. मराठवाडयात जेमतेम ३१ टक्के जलसाठा उपलब्ध असून आजमितीस दीड हजार गाव- वाडयांमध्ये ५११ टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे. विशेष म्हणजे गतवषी याच काळात केवळ पालघर तालुक्यातील दोन वाडयांमध्येच दोन टँकरने पाणीपुरवठा सुरू होता.**



राज्यात गेल्या वषी जानेवारी अखेर पालघर तालुक्यातील तीन आदिवासी पाडयांमध्ये टँकरने पाणीपरवठा करावा लागला होता. मात्र यंदा पाऊस कमी झाल्यामुळे छोटे छोटे जलस्त्रोत आटू लागले असून धरणांमधील पाणीसाठयातही घट होऊ लागली आहे. थंडीमुळे पिकांसाठी पाण्याची मागणी गेले महिनाभर कमी असली तरी आता थंडी कमी होऊ लागल्यामुळे पाण्याच्या मागणीत वाढ होत आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात छोटे नाले, नदीपात्रातील जलस्त्रोत बंद होऊ लागल्याने टँकरच्या मागणीत वाढ होत आहे.

टँकरग्रस्त गावे, वाडया

राज्यात ४५६ गावे, १०८७ वाडयांमध्ये सध्या ५११ टँकरने पाणी पुरवठा. यांपैकी केवळ ४७ टँकर शासकीय उर्वरित खासगी.

सर्वाधिक धरणे असलेल्या नाशिक जिल्ह्यातच सर्वाधिक १२८ गावे व २५५ वाडयांमध्ये १२३ टँकरने पाणीपुरवठा.

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात ११० गाव-वाडयांमध्ये १०५ टँकरने पाणीपुरवठा.

सातारा जिल्ह्यात ४०, सांगली जिल्ह्यात ४३ टँकरने पाणीपुरवठा, जिल्ह्यांत टँकरची वाढती मागणी.

नागपूर विभागातील विविध धरणांमध्ये ६२ टक्के, अमरावती विभागात ६५ टक्के, नाशिस विभागात ५८ टक्के, पुणे विभागात ५६ चक्के तर कोकणातील विविध धरणांमध्ये ६८ टक्के जलसाठा शिल्लक आहे. राज्यातील संभाव्य पाणीटंचाई आणि चारा टंचाईचा विचार करून आतापासूनच युद्धपातळीवर उपाययोजना सुरू करण्यात आल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.

# राज ठाकरेंचा टोल कर्मचाऱ्यांना हिसका

**ठाणे :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे गेल्या अनेक वर्षांपासून टोलच्या मुद्द्यावरून आक्रमक भूमिका घेत असतात. काही महिन्यांपूर्वीच त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत टोलनाक्यांवर होणारी अतिरिक्त वसुली आणि नियमांची मोडतोड, याबाबत कडक कारवाई करण्याची मागणी केली होती. मात्र अजूनही टोलनाक्यांवर नियमांची पायमल्ली होत असून आज याचा अनुभव स्वतः राज ठाकरे यांनाच मुंबईच्या एन्ट्री पॉईंटवरील आनंदनगर टोल नाक्यावर आला. यावेळी राज ठाकरे यांनी कोंडीत अडकलेल्या वाहनांना विना टोल पुढे सोडण्यास प्रशासनाला भाग पाडले. तसेच टोल प्रशासनाची खरडपट्टी काढली.

नाशिक येथील पदाधिकाऱ्यांचा दौरा आटपून मुंबईकडे परतणाऱ्या मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ठाणे येथील शासकीय विश्रामगृहात शुक्रवारी सायंकाळी हजेरी लावली. त्यानंतर मुंबईकडे निघालेल्या राज ठाकरे यांना आनंदनगर टोल नाक्यावर कोंडीचा सामना करावा लागला. यावेळी स्वतः गाडी चालवणाऱ्या ठाकरे यांनी वाहनामधून उतरून टोल प्रशासनाला समज दिली. तसेच कोंडीमध्ये अडकलेल्या वाहनांना विना टोल सोडण्यास सांगितले.

गेल्या महिन्यात खालापूर टोल नाक्यावर देखील राज ठाकरे यांनी अशाच पद्धतीने टोल प्रशासनाला कोंडीमुळे धारेवर धरले होते. त्याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला. यावेळी राज ठाकरे यांच्यासह मनसे नेते अविनाश अभ्यंकर उपस्थित होते.

ठाकरे यांचा रुद्रावतार पाहून टोलनाक्यावरील वाहने विना टोल पुढे सोडण्यात आली. या टोल नाक्यावरील वसुली विरोधात मनसे पदाधिकाऱ्यांनी काही महिन्यांपूवी आंदोलन केले होते. या आंदोलनाला खुद्द राज ठाकरे यांनी भेट दिली होती. मात्र अद्याप या टोल नाक्यावर सकाळ-संध्याकाळ वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने वाहन चालक हैराण होत आहेत.

# मराठा सर्वेक्षण ९० टक्के पूर्ण; प्रशासनाचा दावा

## आचारसंहितेपूर्वी अहवाल सरकारकडे?

**पुणे :** मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्याची मुदत शुक्रवारी संपली असून, राज्यात सुमारे ९० टक्के कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. ज्या जिल्ह्यातील सर्वेक्षणाचे काम प्रलंबित असेल, तेथे अपवादात्मक परिस्थितीत सर्वेक्षणाला मुदतवाढ देण्याचे संकेत राज्य मागासवर्ग आयोगाने दिले आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूवी सर्वेक्षणाचा सर्वंकष अहवाल राज्य सरकारकडे दिला जाणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता मार्चच्या पहिल्या आठवडयात लागू होण्याची शक्यता गृहित धरून सर्वेक्षणाला मुदतवाढ देण्यास आयोगाने नकार दिला. त्यानुसार शुक्रवारी रात्री १२ वाजेपर्यंत सर्वेक्षणाचे काम करण्यात आले.

राज्यातील ३६ जिल्हे, २७ महानगरपालिका आणि सात कटक मंडळांमध्ये (कॅन्टोन्मेंट बोर्ड) हे सर्वेक्षण करण्यात आले. घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याची जबाबदारी प्रगणक, पर्यवेक्षकांवर सोपवण्यात आली होती. त्यासाठी राज्यभरातील एकूण एक लाख २५ हजारपेक्षा अधिक प्रगणक, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. मराठा समाजाचे मागासलेपण जाणून घेण्यासाठी करण्यात आलेल्या या सर्वेक्षणामध्ये विविध प्रकारची माहिती संकलीत करण्यात आली. त्यासाठी पुण्यातील गोखले राज्यशास्त्र व अथर्शास्त्र संस्थेने प्रश्नावली तयार केली होती.

राज्य मागासवर्ग आयोगाकडे राज्यातील सर्वेक्षणाचा विदा जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्तांमार्फत शनिवारी (३ फेब्रुवारी) सकाळी १० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. संकलित माहितीची वगर्वारी करणे, गुणोत्तर काढणे याबरोबरच चुका, शंकाही दूर करण्यात येतील. त्यानंतर जाहीर प्रकटनावर प्राप्त हरकती, सूचनांवर सुनावणी घेतली जाईल. त्यानुसार सर्वंकष अहवाल तयार करून तो राज्य सरकारला सादर केला जाईल. त्यानंतर राज्य सरकार विशेष अधिवेशन बोलावून मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत निर्णय घेण्याची शक्यता आहे. सर्वेक्षणातील माहितीच्या आधारे मराठा आरक्षणासाठी राज्य सरकार नवा कायदा आणण्याची किंवा आणखी काही पर्याय देण्याची शक्यता आहे.

ओबीसी प्रवर्गातच मराठा आरक्षण शक्य : प्रा. बापट

अलिबाग : मराठा समाजाला आरक्षण द्यायचे असेल तर ते ओबीसी प्रवर्गाच्या आरक्षणातच द्यावे लागेल, त्याला पर्याय नाही, असे स्पष्ट मत राज्यघटनेचे अभ्यासक उल्हास बापट यांनी अलिबाग येथे व्यक्त केले. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता, न्यायालयात टिकेल असे आरक्षण मराठा समाजाला दिले जाईल, असे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री सांगत आहेत, पण कसे देणार हे मात्र ते सांगत नाहीत. कारण सध्याच्या परिस्थितीत या दोन्ही गोष्टी शक्य नाहीत, अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

राज्य सरकारने निश्चित केलेल्या वेळेत अहवाल सादर करायचा आहे. लोकसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्वेक्षणाला २ फेब्रुवारीनंतर मुदतवाढ देण्यात आली नाही. सर्वेक्षणाचा अहवाल जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांच्याकडून आयोगाकडे येईल.

**– चंद्रलाल मेश्राम,** सदस्य, राज्य मागासवर्ग आयोग

शुक्रवार सायंकाळपर्यंतचे विभागनिहाय सर्वेक्षण

| विभाग | सर्वेक्षण (%) |
|---|---|
| कोकण | ९३ |
| पुणे | ८०.१८ |
| नाशिक | ९१ |
| छत्रपती संभाजीनगर | ९० |
| अमरावती | ८५ |
| नागपूर | ९२ |

# दीड वर्षांत २४ हजार पोलीस भरती;

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कामगिरी

**मुंबई :** उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गेल्या दीड वर्षांतील कायर्काळात २४ हजार पोलिसांची पदभरती मागी लावली असून अमली पदार्थ माफियांवरही कठोर कारवाई केली आहे. त्यांच्या कायर्काळात सुमारे ५० हजार कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करून नष्ट करण्यात आले आहेत.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या काळात पोलीस भरती सुमारे तीन वर्षे रखडली होती. त्यामुळे मुंबई, पुण्यासारख्या शहरांमध्ये सणासुदीला बंदोबस्त व अन्य कामांसाठी पोलीस दल अपुरे पडत होते. फडणवीस यांनी गृहखात्याची सूत्रे हाती घेतल्यावर पोलीस भरतीचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. भरती झाली तरी पोलिसांचे प्रशिक्षण होऊन ते सेवेत दाखल होण्यासाठी दीड-दोन वर्षांचा कालावधी लागतो. हे लक्षात घेऊन राज्यातील पोलीस प्रशिक्षण अकादमींची क्षमता टप्प्याटप्प्याने वाढविण्याचा निर्णय फडणवीस यांनी घेतला आहे.

सध्याच्या काळात आर्थिक फसवणूक आणि सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. हा गुन्हा घडल्यावर तातडीने कारवाई होणे गरजेचे असते. त्यादृष्टीने राज्यात सायबर सुरक्षा प्रकल्प उभारण्यात येत असून त्यासाठी ८३८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याअंतर्गत अत्याधुनिक सायबर लॅब सुरू करण्यात येतील, असे फडणवीस यांनी सांगितले.



अमली पदार्थाच्या जाळ्यात तरुण पिढी अडकत असून या पदार्थाची तस्करी करणाऱ्यांचा बीमोड करण्याची मोठी मोहीम पोलिसांनी हाती घेतली आहे. ५० हजार कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करून नष्ट करण्यात आले. ही कारवाई यापुढेही धडाडीने सुरू ठेवण्याचा फडणवीस यांचा निर्धार आहे.

पोलिसांना कायदेशीर कारवाईची पूर्ण मुभा असल्याने गुन्हेगारांवर कठोर कारवाई सुरू झाली आहे. पोलीस अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये गृहमंत्र्यांचा हस्तक्षेप होत नसून महासंचालकांना सर्व अधिकार देण्यात आले आहेत. पोलीस ठाण्यांमध्ये दूरध्वनी करून होणारे राजकीय हस्तक्षेप थांबले आहेत.

महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी किंवा गुन्हे व घटनांची माहिती घेण्यासाठी फडणवीस हे स्वतः पोलीस आयुक्त किंवा जिल्हा अधीक्षक यांच्याशी थेट संपर्कात असतात व गरज भासल्यास सूचना देतात. त्यामुळे मध्यस्थांचा प्रश्न येत नाही. फडणवीस हे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत असल्याने ते दररोज हजारो संदेश पाहतात आणि ५०० हून अधिक संदेशांना उत्तरे पाठवितात.

ते रात्रंदिवस संपर्कात राहतात. त्याचा अनुभव नुकताच मीरा-भाईंदर येथील नयानगरमध्ये घडलेल्या घटनेच्या वेळी आला. फडणवीस हे तेथील परिस्थितीवर जातीने लक्ष ठेवून होते आणि पहाटे साडेतीन वाजताही त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांकडून परिस्थितीचा आढावा घेतला.

श्वान प्रशिक्षण केंद्र

महाराष्ट्र कॅसिनोसाठीचा कायदा कायमस्वरुपी रद्द करण्याचा निर्णय गृहखात्याने काही काळापूवी घेतला. पोलीस तपासासाठी श्वान पथकाचा उपयोग होतो. त्यासाठी गोजुबावी (बारामती) येथे श्वान प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येत असून त्यासाठी ५६ कोटी ७६ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. राज्यात गेली अनेक वर्षे केवळ एकच प्रशिक्षण केंद्र होते. पोलिसांना देण्यात येणाऱ्या सवलतींमध्येही वाढ करण्यात आली असून पोलीस शिपायांपासून निरीक्षकांना आता वार्षिक १२ ऐवजी २० नैमित्तिक रजा मंजूर करण्यात आल्या आहेत. पोलिसांना सवलतीच्या दरात गृहकर्जासाठी २०१७ मध्ये सवलत योजना सुरू करण्यात आली होती व तिला चांगला प्रतिसाद असूनही ती महाविकास आघाडी सरकारच्या काळात बंद होती. ती पुन्हा सुरू करण्याचा निर्णय फडणवीस यांनी घेतला आहे.

नवीन न्यायालये सुरू

उच्च, जिल्हा आणि महानगर दंडाधिकारी न्यायालयांमध्ये प्रलंबित प्रकरणांची संख्या लक्षात घेऊन गृह बरोबरच विधी व न्याय खात्यानेही अनेक निर्णय गेल्या दीड वर्षांत घेतले आहेत. नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठात अतिरिक्त सचिवांची पदे निर्माण करण्यात आली आहेत. औसा, सिन्नर, परांडा (धाराशिव), येवला (नाशिक), इगतपुरी (नाशिक), माणगाव (रायगड-अलिबाग), रामटेक (नागपूर), बेलापूर (नवी मुंबई), दौंड (पुणे), मुखेड (नांदेड), उमरखेड (यवतमाळ), चिखलदरा (अमरावती), महाड (रायगड-अलिबाग), जिल्हा (नाशिक), वरुड (अमरावती), फलटण (सातारा) मंडणगड (रत्नागिरी), सिल्लोड, कर्जत (अहमदनगर), वाई (सातारा), राहता (नगर), विटा (सांगली) येथे विविध न्यायालये सुरू करण्यात आली आहेत. नागपूर येथे ५ अतिरिक्त कौटुंबिक न्यायालये तर पुणे येथे ४ अतिरिक्त कौटुंबिक न्यायालये सुरू होत आहेत. १६ अतिरिक्त न्यायालये आणि २४ जलदगती न्यायालयांना आणखी २ वर्ष मुदतवाढ देण्याचा निर्णय फडणवीस यांनी घेतला आहे.

# शिरोळ तालुक्यातील दानोळी, उदगाव येथील दुध डेअरीवर धाडी

## वजनात, फॅट व एस एन एफमध्ये फसवणूक होत असल्याचे आले समोर

**शिरोळ :** वैध मापन विभागाच्या राज्याच्या नियंत्रकांनी दुध संकलन करणाऱ्या दुध डेअरी ना १० मिली अक्युरशी असलेले वजन काटे वापरण्याचे आदेश दिले होते, तसेच जिल्ह्याचे दुग्ध विकास अधिकाऱ्यांनी फॅट व एस एन एफ काढण्यासाठी ऑटो मिल्क टेस्टर वापरणे व त्यानुसार उत्पादकास दर देण्याचे परीपत्रक काढून सूचना केल्या होत्या.

शिरोळ तालुक्यात अनेक दुध डेअरी कडून याचे पालन होत नसल्याची बाब आंदोलन अंकुश ने जिल्हा दुग्ध विकास अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणली होती. याची दखल घेऊन दुग्ध विकास विभागातील अधिकाऱ्यांनी



शिरोळ तालुक्यातील दानोळी आणि उदगाव येथे अचानक धाडी टाकून कारवाई केली असल्याने शिरोळ तालुक्यातील दूध उत्पादक संस्थामध्ये खळबळ उडाली आहे.

या दुध डेअरीमध्ये वजनकाटा १०० मिली अक्युरशी वापरला जात होता.

वजन दर्शवणाऱ्या डिस्प्ले वर चिकट पट्टी लावल्याचे दिसले. वजन काट्यावर आलेले वजन उत्पादकांच्या वहीत नोंदवले जात नाही. एस एन एफ काढला जात नाही वहीत नोंदवला जात नाही. फॅट काढण्यासाठी जादा दुध घेतले जात होते. ऑटो मिल्क टेस्टर असताना वापरले जात नाही.

**वरील दोन्हीही संस्था माजी मंत्री सतेज उर्फ बंटी पाटील यांची सत्ता असलेल्या कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ (गोकुळ) व माजी खासदार राजू शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या स्वाभिमानी दूध संघ जयसिंगपूर या संघांना पुरवठा करत असल्याची चर्चा नागरिकांत ऐकावयास मिळत होती.**

वरील गंभीर बाबी उघड झाल्याने दुध उत्पादकांची दररोज फसवणूक होत असल्याचे विभागाच्या या धाडीतून समोर आल्याने अधिकाऱ्यांनी आपला अहवाल दुग्ध विकास विस्तार अधिकारी श्री दवडते यांनी जिल्हा दुग्ध विकास अधिकारी नामदेव. आवटे यांच्याकडे सादर केला आहे.

या अहवालाच्या आधारे या दुध डेअरी ना नोटीस काढणार असल्याचे व या वरील त्रुटी दुरुस्त करण्याचे आदेश जिल्हा दुग्ध विकास अधिकारी व दुग्ध विभागाचे सहाय्यक निबंधक प्रदीप मालगावे यांनी सांगितले आहे.

# उल्हासनगरमध्ये भाजप आमदाराकडून शिंदे गटाच्या शहरप्रमुखावर गोळीबार

**कल्याण :** उल्हासनगर मधील हिल पोलीस ठाण्यात शुक्रवारी रात्री भाजपचे कल्याण पूवर्चे आमदार गणपत गायकवाड आणि शिवसेनेचे शिंदे गटाचे कल्याण पूर्व विभागाचे शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यात बोलाचाली झाली. यावेळी आमदार गणपत गायकवाड यांनी महेश गायकवाड आणि त्यांच्या समथर्कांवर गोळीबार केल्याची घटना घडली आहे.

या घटनेने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. महेश गायकवाड यांना पाच गोळ्या आणि त्यांच्या एका समथर्काला गोळ्या लागल्याची माहिती प्रत्यक्षदशीने माध्यमांना दिली. आमदार गायकवाड आणि शहरप्रमुख महेश गायकवाड शुक्रवारी रात्री हिललाईन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अनिल जगताप यांच्या दालनात बसले होते. त्यावेळी आमदार



गायकवाड, शहरप्रमुख यांच्यात बोलाचाली झाली.यावरून संतप्त झालेल्या आमदारांनी महेश यांच्यावर गोळीबार केल्याची माहिती प्रत्यक्षदर्शीने दिली.

गेल्या वर्षभरापासून दोन्ही गायकवाड गटात कल्याण पूर्वेतील विधानसभेच्या उमेदवारीवरून रस्सीखेच सुरू आहे. एकमेकांना लक्ष्य करण्याची एकही संधी दोघेही सोडत नाहीत. त्या वैमनस्यातून हा प्रकार घडला असण्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या घटनेला दुजोरा दिला. विस्तृत माहिती देण्यास पोलीस नकार देत आहेत. आमदार गायकवाड यांना पोलीस ठाण्यात बसून ठेवण्यात आले आहे. शहरप्रमुख गायकवाड यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आमदार गायकवाड यांना संपर्क केला. त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

# सदैव सर्वांचे सर्वांसाठी

भारतीय प्रजासत्ताक आज आपल्या प्रवासाची ७४ वर्षे पुरी करून अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताच्या स्वातंत्र्याची पहाट झाली आणि भारतीय राज्यघटना तयार करण्याचा जगाला आदर्श ठरावा असा उद्यम पुरा होऊन २६ जानेवारी, १९५० रोजी खऱ्या अर्थाने भारतीय प्रजासत्ताक जन्माला आले. प्रजा-सत्ताक या शब्दातच भारतीय नागरिकांच्या सर्वोच्च अधिकारांचे सूचन आहे. प्रजेची, आपल्या सर्वांची समान सत्ता असणारे हे राज्य आहे. सर्वांना अधिकारही समान आहेत.

भारताच्या घटनाकारांनी या स्वतंत्र देशाची संकल्पना केवळ लोकशाहीच्या राज्यव्यवस्थेने चालणारे नवजात राष्ट्र इतकीच केलेली नाही. लोकशाही हे प्रधान अंग आहेच. मात्र, प्रत्येक नागरिकाला मिळणाऱ्या सामाजिक न्यायाची, विकासाच्या संधीची आणि सवतोपरी समान अधिकारांची अधोरेखा राज्यघटनेतील कलमोकलमी आहे. जगाचा इतिहास पाहिला, तर अनेक लोकशाही आणि निवडणुका होत असणाऱ्या देशांमध्येही महिलांना, गुलामांना, गरिबांना आणि वंचितांना सवतोपरी समान अधिकार तत्काळ मिळालेले नाहीत. अधिकार क्रमाक्रमाने मिळत गेले आहेत. ज्या ब्रिटिश आदर्शाची आपण चहा करतो, तेथेही ह्यहाउस ऑफ लॉर्ड्सह्वची रचना निर्दोष नाही. तेथे धमर्गुरूंना मिळणारे स्थान आणि मतदानाचा अधिकार हे निकोप लोकशाहीचे लक्षण नाही. अमेरिकेत असत्याचा बेगुमान डिजिटल प्रसार, अत्यंत खर्चिक निवडणूक मोहिमा, प्रशासकीय अधिकारांचा वाढता विळखा आणि न्यायालयीन निष्पक्षतेचा सापेक्ष तराजू, असे अनेक धोके लोकशाहीसमोर आहेत. त्यांची जाहीर चिंता केली जाते. ह्यआम्ही लोकशाही देश आहोत आणि आम्हाला कोणी काही शिकविण्याची



**भास्कर सदावर्ते**

गरज नाही, असा उद्दाम आविष्कार अनेकदा भारततही दिसतो. आपण नेमके कुठे आहोत आणि आपल्याला कुठे जायचे आहे; याचा विचार करणे उत्सवाइतकेच मोलाचे आहे, असायला हवे.

अयोध्येत श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत खास ठराव करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करण्यात आले. मात्र, ह्यदेशाचे शरीर १५ ऑगस्ट १९४७ रोजी मुक्त झाले असले, तरी देशाच्या आत्म्याची प्रतिष्ठापना २२ जानेवारी, २०२४ रोजी झाली,ह्व असे या ठरावात म्हटले आहे. मुळात केंद्रीय मंत्रिमंडळाने असा ठराव करण्याची आवश्यकता होती का, असा प्रश्न आहे. दुसरे म्हणजे, १५ ऑगस्ट १९४७ ते २२ जानेवारी २०२४ या काळात देशाचा आत्मा काय बंदिवासात होता का? अयोध्येत राम मंदिर होणे, ही निःसंशय आनंदाची आणि नैसर्गिक न्यायाची प्रक्रिया पूर्ण करणारी घटना आहे. मात्र, देशाच्या सरकारला, संसदेला, राज्यघटनेला आणि कारभाराला कोणताही धर्म नाही. पंतप्रधान असताना अटलबिहारी वाजपेयी गुजरातमधील दंगलींनंतर अहमदाबादमध्ये गेले होते. तेव्हा त्यांनी म्हटले होते, ह्यराजधर्म का पालन होना चाहिए। राजधर्म ! राजा के लिए, शासक के लिए प्रजा-प्रजा में कोई भेद नही हो सकता। ना जन्मके आधार पर, ना जातीके आधार पर, ना संपद्रायके आधार पर।ह्व वाजपेयी भारतीय राज्यघटनेचा आत्माच सूत्ररूपाने तेव्हा सांगत होते. हा ह्यराजधर्मह्व सर्व धर्मांच्या पलीकडचा, सर्वांना समान न्याय देणारा आणि कुणाचेही कोणत्याही निमित्ताने लांगूलचालन करणारा असू शकत नाही. सर्वांना समान न्याय देण्यासाठी राज्यघटनेतील ऐहिक आणि आधुनिक मूल्यांची चौकट मनोमन मान्य करावी लागते. ती धाडसाने अमलात आणावी लागते. ब्रिटिशांनी रद्द केलेली सतीची प्रथा किंवा अलीकडे मोदी सरकारच्या काळात रद्द झालेली तिहेरी तलाकाची प्रथा म्हणजे ऐहिक न्याय-राज-धर्माचे पाऊल पुढे पडणे होय.

भारताने गेल्या ७४ वर्षांमध्ये केलेली प्रगती अलौकिक आहे. तिची नुसती जंत्रीही छाती अभिमानाने फुलून यावी अशी आहे. हरित क्रांतीपासून अंतराळ क्रांतीपर्यंत आणि अणुशक्तीपासून सैन्यशक्तीपर्यंत, जगभर पसरलेल्या अनमोल मनुष्यसंपदेपासून देशाच्या मातीतल्या अपार गुणसंपदेपर्यंत भारताने चौफेर दौड केली आहे. मात्र, आजही आम्ही गरिबी व कुपोषण यांच्यावर निःसंशय विजय मिळविलेला नाही. परवाच्या पाहणीत श्रीमंत व गरीब यांच्यातील अंतर वाढल्याचे दिसते आहे. ही स्थिती महासत्ता होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या देशाला खचितच भूषणावह नाही. भारतीय राज्यघटनेत ह्यसमाजवादह्व हा शब्द आणीबाणीत आला असला, तरी त्यातला सर्वांच्या समानतेचा अर्थ पाच आणि नंतर दहा लाख कोटी डॉलर स्वप्नांच्या गदारोळात विरून जाऊ नये. यंदा मरणोत्तर भारतरत्न दिलेले कर्पूरी ठाकूर यांनी बिहारचे मुख्यमंत्री असतानाही निष्कांचन राहणे आणि पत्नीने चुलीवर रांधणे, हे केवळ ह्यगोड गोड गोष्टीह्वत राहू नये. त्यापासून सर्वांनी शिकायला हवे. नवभारताचा उज्ज्वल प्रवास १५ ऑगस्ट १९४७ रोजीच सुरू झाला. तो पुढे जातो आहे. या प्रवासाच्या कथा राजधानीतून नव्हे, तर ओडिशा, राजस्थान, झारखंड, महाराष्ट्र अशा राज्यांमधील झोपड्यांमधून ऐकू यायला हव्यात. त्या कथांमध्ये साफल्याची व समाधानाची अक्षरे असतील; तेव्हा भारतीय प्रजासत्ताक आणखी तेजाने झळाळेल.

## अब की बार भाजप तडीपार - उद्धव ठाकरे



**अलिबाग :** ज्या पक्षाने नरेंद्र मोदींना पंतप्रधान पदावर बसवले, त्याच पक्षाला आज भाजपवाले संपवायला निघाले आहेत. पंचवीस वर्षात भाजपचा पुर्ण अनुभव घेतला आहे. पाठ वळली की वार करायला कमी करणार नाही. त्यामुळे आता माघार नाही. अब की बार भाजपला तडीपार करावेच लागेल असे आवाहन उध्दव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना केले. ते माणगाव येथे जनसंवाद मेळाव्यात बोलत होते.

शिवडी न्हावा शेवा पुलाचा पहिला गर्डर माझ्या कायर्काळात ठेवला गेला. त्याचे उद्घाटन करायला नरेंद्र मोदी आले. आता ज्या वरळी ते मरिन ड्राईव्ह कोस्टल रोडचे भूमिपुजन माझ्या कायर्काळात झाले, त्या कोस्टल रोडचे उद्घाटन करण्यासाठी पंतप्रधान पुन्हा मुंबईला येत आहेत. आम्ही केलेल्या कामाचे श्रेय घ्या. पण मुंबईत शिवस्मारकाचे जलपुजन मोदींच्या हस्ते झाले होते. ते कधी होणार, मुंबई गोवा महामार्गाचे काम कधी पुर्ण होणार असा सवाल ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला. कोकणात तौक्ते निसर्ग वादळे आली होती तेव्हा पंतप्रधान कुठे होते असा प्रश्नही त्यांनी विचारला.

भारतीय सीमेवर चीन घुसखोरी करतो आहे. तो तुमचा दुष्मन आहे की आजवर तुम्हाला साथ देणारी शिवसेना, २०१४ साली भाजपने मोदींचे नाव पंतप्रधान पदासाठी जाहीर करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी त्यांना पाठींबा देणारी पहिला व्यक्ती उध्दव ठाकरे आणि पक्ष शिवसेनाच होता. तरी पण लोकसभा निवडणूक झाल्यावर भाजपने आमच्याशी युती तोडली. आता आमचा पक्षच संपवायला घेतला. आज मुस्लिम समाज आमच्या सोबत आला आहे. कारण त्यांना आमचे हिंदूत्व मान्य आहे. त्यामुळेही काहींना पोटशूळ उठला आहे. आम्ही काँग्रेस सोबत गेलो म्हणून हिंदूत्व सोडल्याचा आरोप केला जातो. पण पंचवीस वर्ष तुमच्या सोबत राहून आमच्या पक्षाचा भाजप झाला नाही तर काँग्रेस कसा होणार असा प्रश्न त्यांनी विचारला.आज आपण जागे झालो नाही तर उद्या असे झोपू की पुन्हा उठता येणार नाही, हुकूमशाहीचा वरवंटा आपल्या डोक्यावर कधी फिरेल कळणार नाही. त्यामुळे जागे व्हा, मी आणि फक्त मीच ही वृत्ती ठेचायती आहे. त्यासाठी तयारीला लागण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. यावेळी भास्कर जाधव, अनंत गीते यांनीही उपस्थितांना संबोधित केले.

## राणीच्या बागेतील आर्थिक तरतुदीत वाढ

### २३.५१ कोटींहून तब्बल ७४.३० कोटींची रक्कम प्रास्तावित



**मुंबई :** महानगरपालिकेच्या २०२४ झ २५ च्या अथर्सकल्पात वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालयातील आधुनिकीकरणाच्या कामासाठी तब्बल ७४.३० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सन २०२३ झ २४ या वर्षासाठी केवळ २३.५२ कोटींची रक्कम प्रास्ताविण्यात आली होती.

आर्थिक वर्ष २०२४ झ २५ मध्ये पेंग्विन कक्षासमोर अॅक्वा गॅलरी आणि परिसरातील अंतर्गत रस्त्यांची कामे हाती घेण्यात येणार आहेत. तसेच, आगामी वर्षात जुन्या रोपवाटिका जागेवर थीम आधारित नवीन उद्यान व विस्तारित भूखंडावर एक नवीन रोपवाटिका संकुल कार्यान्वित करण्यात येणार आहे.

# मुसळगाव औद्योगिक वसाहतीत रासायनिक कारखान्याला भीषण आग

**नाशिक** - सिन्नर तालुक्यातील मुसळगाव औद्योगिक वसाहतीत आदिमा ऑरगॅनिक या रासायनिक कारखान्याला शुक्रवारी दुपारी आग लागली. कारखान्यातील रसायनांच्या टाक्यांचे स्फोट होऊन आगीने रौद्रावतार धारण केला. सायंकाळी उशिरापर्यंत आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न अग्निशमन दलाच्या पाच बंबांकडून केले जात होते.

या आगीत कुठलीही जिवितहानी झाली नसल्याची माहिती मुसळगाव औद्योगिक वसाहतीचे प्रमुख नामकर्ण आवारे यांनी दिली. दुपारी चार वाजता आदिमा ऑरगॅनिक या रासायनिक कारखान्याला अकस्मात आग लागली. कारखान्यात २५ कामगार काम करतात. दुर्घटना घडली तेव्हा १० ते १२ कमर्चारी कामावर हजर असल्याची प्राथमिक माहिती असल्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी सांगितले. आग लागल्याचे लक्षात येताच कामगारांनी बाहेर धाव घेत या घटनेची माहिती अग्निशमन दलास दिली. काही वेळात आग सर्वत्र पसरली. कारखान्यात रासायनिक पदार्थ साठवणुकीच्या टाक्या आहेत. त्यांचे स्फोट होऊ लागले. दुरवरून आगीचे लोट दिसत होते. प्रारंभी सिन्नर नगरपालिकेचे बंब दाखल झाले. परंतु, आगीची तीव्रता पाहून नाशिक महानगरपालिकेकडून मदत मागवण्यात आल्याचे आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून सांगण्यात आले. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

मुसळगाव-सिन्नर मार्गावरील आदिमा ऑरगॅनिक या रसायन निमिती करणाऱ्या कारखान्यातील आग आटोक्यात आणण्याचे काम अग्निशमन दलाकडून युध्दपातळीवर सुरू आहे. पोलीस, महसूल व आरोग्य विभागाचे कमर्चारी घटनास्थळी उपस्थित आहेत. या घटनेची चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**- दादा भुसे**
(पालकमंत्री, नाशिक)



## ज्येष्ठ दिग्दर्शक, अभिनेते साधू मेहर यांचे निधन

**मुंबई :** हिंदी आणि ओडिया चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक पद्मश्री सन्मानित साधू मेहर यांचे शुक्रवारी, २ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. मुंबईतील निवासस्थानी मेहर यांनी अखेरचा श्वास घेतला.ऐंशीच्या दशकात हिंदी चित्रपटसृष्टीत समांतर चित्रपट चळवळीतून ज्या कलाकारांनी लक्ष वेधून घेतले त्यांच्यापैकी साधू मेहर हे नाव आघाडीवर होते.

# राज्यात दीड वर्षात सांस्कृतिक कार्यक्रमांवर ६११ कोटी खर्च !

**मुंबई :** राज्यात गेल्या दीड वर्षात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांवर ६११ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला. एक कोटीपेक्षा जास्त खर्चाचे २० सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून त्यावर सुमारे २६० कोटी रुपये खर्च करण्यात आला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवावर सर्वाधिक खर्च करण्यात आला आहे.

महायुती सरकारमध्ये भाजपचे सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे सांस्कृतिक कार्य खात्याचा कायर्भार आहे. मुनगंटीवार यांच्या कायर्काळात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू झाली. सांस्कृतिक कार्य विभागाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाबरोबरच इतर सांस्कृतिक कार्यक्रमांवर खर्च करण्याचा धडाकाच लावला आहे. या संदर्भात प्रस्तुत प्रतिनिधीने राज्यात ३० जून २०२२ नंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांवर झालेल्या खर्चाची मागणी माहिती अधिकार कायद्यानुसार केली होती. त्यावर या विभागाने ऑगस्ट २०२३ अखेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रमांवर ५०९ कोटी रुपये खर्च केल्याची माहिती दिली. त्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाने जारी केलेले सुमारे २०० हून अधिक ह्यशासन आदेशह्व माहिती अधिकारातून प्राप्त झाले. त्यानंतर पुढील पाच महिन्यांच्या म्हणजे जानेवारी २०२४ अखेर पर्यंतच्या शासन आदेशांचे अवलोकन केले असता, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांवरील खर्चाचा आकडा ६११ कोटी ९४ लाख ६० हजार ७६३ रुपये असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य शासनाचा पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग असा एकच प्रशासकीय विभाग आहे. या विभागासाठी २०२३-२४ च्या अथर्सकल्पात एकूण ३१७७.८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यात पर्यटन विभागासाठी १९१५ आणि सांस्कृतिक कार्य विभागासाठी १२६२.८० कोटी तरतूद आहे. त्यात वेतनावरील खर्च आणि विविध योजनांवरील खर्चाचा समावेश आहे. त्या अंतर्गतच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवासाठी ८४४ कोटींची तरतूद आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५०व्या राज्याभिषेक सोहळ्यासाठी चालू अथर्सकल्पात ३५० कोटी रुपये प्रस्तावित केल्याची घोषणा करण्यात आली होती, परंतु स्वांतत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत त्यासाठी तूर्तास ५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती सांस्कृतिक कार्य विभागाने दिली आहे. त्याशिवाय, स्वांतत्र्यांच्या अमृतमहोत्सवाअंतर्गत राष्ट्रपतींचे स्वागत आणि संसदीय समितीच्या दौऱ्यांच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांवर मुक्त हस्ते खर्च करण्यात आल्याचे माहिती अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते.

एक कोटीहून अधिक खर्चाचे काही कार्यक्रम

नदी पुनर्भरण, हॅलोऐवजी वंदेमातरम अभियान- १ कोटी ६९ लाख ४३ हजार ३७३ रुपये

महावाद्य मेळावा, वाद्य महोत्सव-१ कोटी ०७ लाख ३६ हजार रुपये

पंचायत समिती स्थरावर स्वराज्य महोत्सव-३५ कोटी ४५ लाख रुपये

मेरी माटी मेरा देश, सांस्कृतिक महोत्सव-१ कोटी ५० लाख रुपये

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव एक छत्र योजना निधी वितरण- ६० कोटी १८ लाख ८० हजार २४४ रुपये

घरोघरी तिरंगा, ध्वज पुरवठा-३ कोटी १५ लाख रुपये

महाराष्ट्रात साडे तीन शक्तीपीठ रथाचे प्रदर्शन -१ कोटी १३ लाख २० हजार रुपये

स्वातंत्रयाचा अमृत महोत्सव, चंद्रपूर-३ कोटी रुपये

महाराष्ट्र भूषण पुरस्कार (२०२१) वितरण सोहळा खर्च-३ कोटी ५४ लाख ६३ हजार रुपये

प्रत्येक जिल्ह्यात सांस्कृतिक महोत्सव-२० कोटी रुपये

फिल्मफेअर कार्यक्रम प्रायोजकत्व खर्च-१३ कोटी रुपये

चंद्रपूर-महाकाव्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम- २ कोटी ४७ लाख ७५ हजार रुपये

मुंबई-गेट वे ऑफ इंडिया-महाकाव्य रामायण महोत्सव- ३ कोटी ५० लाख रुपये ( ३१ जानेवारीला हा कार्यक्रम पार पडला.) स्वातंत्र्यांच्या अमृत महोत्सवांतर्गत वरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.)

### खर्च होणारच : सुधीर मुनगंटीवार

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री म्हणून आपल्या दीड वर्षांच्या कार्यकाळात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांवर मोठया प्रमाणावर खर्च झाला आहे, हा खर्च अधिक आहे, असे वाटत नाही का, असे सुधीर मुनगंटीवार यांना विचारले असता, त्यांनी झालेल्या खर्चाचे समर्थन केले. ह्यह्यस्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि शिवराज्यभिषेक या कार्यक्रमांवर मोठा खर्च झाला आहे. हा पैसा कलाकारापर्यंत पोहोचला पाहिजे, अशी आपली भूमिका आहे. त्यामुळे पाच-पन्नास कोटी रुपये खर्च झाला तर बिघडले कुठे, असा सवाल त्यांनी केला. आपण सर्वच क्षेत्रांमध्ये आघाडी घेतली पाहिजे. महाराष्ट्राला एक सांस्कृतिक परंपरा आहे, या क्षेत्रातही आपण पुढे असले पाहिजे, असेही ते म्हणाले.

दैनिक राजदंड

प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक नियुक्त करण्याबाबत TRAINEE REPORTERS, SUB-EDITORS पाहिजेत

पत्रकारितेतील **मानदंड ठरणाऱ्या दै. राजदंडची (MARATHI) पुणे आवृत्ती आणि THEDEMOCRAT.LIVE (ENGLISH)** नुकतीच सुरू झाली आहे. शहर व जिल्ह्यातील राजकीय घडामोडी, सामाजिक समस्या, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, सांस्कृतिक, उद्योग विश्वातील बदलाची माहिती वाचकांपर्यत पोहचविण्याचा या वृत्तपत्राचा मानस आहे. प्रिंट, ऑनलाईन, युट्यब या माध्यमात राजदंड मीडिया समूहाचे काम चालणार आहे.

पत्रकारितेत करिअर करू पाहणाऱ्या युवक-युवतीसाठी **दै. राजदंडचे** व्यासपीठ दिशादर्शक ठरणार आहे. नवोदित पत्रकारांना हा महत्वाचा प्लॅटफार्म आहे. प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक म्हणून काम करण्याची इच्छा असणाऱ्या आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना **दै. राजदंडमध्ये** संधी उपलब्ध करून देत आहे. तरी याची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना द्यावी, ही विनंती.

कल्पना सुर्वे,
**संचालक,** (HR) दै. राजदंड, पुणे
email: rajdand.pune@gmail.com

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# हडपसरमधील मनपा शाळेत शिक्षक सर्वेक्षणात व्यस्त, वर्ग रिकामी



**हडपसर :** महाराष्ट्र शासनाने मराठा आरक्षणासाठी मराठा लोकांचा सामाजिक, शैक्षणिक व आदी स्तर सर्वे करण्यासाठी शासकीय कर्मचारी व मनपा शिक्षकांना सर्वे करण्यासाठी २३ जानेवारी ते २ फेब्रुवारीपर्यंत सर्वे करण्याच्या कामास लावण्यात आल्याने हडपसर मधील अनेक महापालिका शाळेतील शिक्षक सर्वे मध्ये व्यस्त असल्याने मनपा शाळेत विद्यार्थ्यांना शिकविण्यास शिक्षक नसल्याने मुले शिकण्यापासून वंचित आहेत, वर्गात एक आठवडा झाले शिक्षक शिकवण्यास येत नसल्याचे हडपसर मधील स्व.विठ्ठल तुपे ईलर्निंग शाळेतील विद्यार्थी सांगत आहेत.

या शाळेत कॉन्ट्रक्ट वरील कांही शिक्षक दोन दोन तीन तीन वर्ग एकत्र बसवून शिकवत आहेत. एका वर्गात शंभर दिडशे मुलांना एक टिचर काय शिकवणार ,कायमस्वरुपी शिक्षक शाळेत शिकवण्यास येत नसल्याने शाळेत गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. वर्गात नुसता गोंगाट सुरु आहे, आता काही दिवसात परिक्षा येवून ठेपलेली असताना शाळेतील शिक्षकांना शासकीय कामे लावू नयेत अशी भावना पालक व विद्यार्थ्यांची आहे.

अशाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. निवडणूक व विविध सर्वे करण्याचे काम शिक्षकांना लावू नयेत अशी मागणी पालक,विद्याथी, शिक्षकांनी केली आहे.

# राज्य शासनाच्या धोरणविरोधात खेड राष्ट्रवादी काँग्रेसचे घंटानाद आंदोलन

## आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांची जोरदार घोषणाबाजी

**राजगुरूनगर :** राष्ट्रवादी काँग्रेस खेड तालुका (शरद पवार गट) यांच्यावतीने राजगुरुनगर (ता. खेड) येथे घंटानाद आंदोलन करण्यात आले.

राज्यातील महागाई, शेतमालाची नासाडी, युवा, विद्याथी, शेतकरी, बेरोजगार, महिला सुरक्षा, कामगार, अंगणवाडी सेविका असे सर्वच घटक त्रस्त असून या सर्व घटकांना वेगवेगळ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार रोहित पवार यांच्यावर ईडी कडून केल्या जाणाऱ्या कारवाई विरोधात त्याचप्रमाणे सवर्सामान्य लोकांच्या हिताचे मुद्दे घेऊन लढत असलेल्या या आंदोलनाच्या माध्यमातून लोकांच्या प्रश्नावरही जोरदार आवाज उठवून झोपेचे सोंग घेणाऱ्या सरकारला जागे करण्यासाठी




सवर्सामान्य नागरिकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सरकार कडून वारंवार केला जात असून त्याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्ष कार्यालय खेड तालुका ते तहसील कार्यालय पर्यंत रॅलीच्या माध्यमातून हे आंदोलन झाले. यावेळी खेड तालुकाध्यक्ष हिरामण सातकर, पक्षाचे नेते सुधीर मुंगसे, प्रदेश उपाध्यक्ष राजमाला बुट्टेपाटील, युवक अध्यक्ष विशाल झरेकर, युवक कार्याध्यक्ष ॲड. देविदास शिंदे पाटील, महिलाअध्यक्षा श्रद्धा सांडभोर, राजगुरुनगर शहराध्यक्ष रूपाली टाकळकर, चाकण शहर अध्यक्ष ॲड पूजा फडके, चाकण शहराध्यक्ष अशोक जाधव, युवकअध्यक्ष प्रशांत गोरे, जीवन मिंढे, सतीश पवळे, प्रवक्ते ॲड. बाळासाहेब लिंबोरे पाटील, प्राजक्ता थिगळे, पूर्व विभाग अध्यक्ष माऊली पिंगळे, हरिप्रसाद खळदकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून आम्ही नेहमीच सवर्सामान्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवला आहे. रोहित दादा पवार हेही आदरणीय शरद पवार साहेबांसोबत महाराष्ट्र धर्माच्या विचारांसाठी लढत आहेत. म्हणूनच त्यांच्यावर आकसाने कारवाई केली जात असून ती अन्यायकारक आहे. या कारवाईचा आम्ही तीव्र निषेध करतो. सरकारने कितीही त्रास दिला तरी आम्ही त्यांना शरण जाणार नाही, कुठल्याही परिस्थितीत घाबरून भाजपासोबत पळून जाणार नाही तर कठोर संघर्ष करू, लढू आणि जिंकू.

**- हिरामण सातकर,** तालुकाध्यक्ष रा. काँग्रेस खेड (शरद पवार गट)

# चला जाणूया नदीला अभियानात जिल्हा परिषदेचा सक्रीय सहभाग- रमेश चव्हाण

**पुणे :** नद्या या मानवी संस्कृतीसाठी कायमच महत्त्वाच्या राहिल्या असून आताच्या आणि भावी पिढीच्या अस्तित्वासाठी त्यांचे प्रवाही राहणे गरजेचे आहे; यादृष्टीने जिल्ह्यात सुरू करण्यात आलेले ह्यचला जाणूया नदीलाह्न अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सर्व संबंधित यंत्रणा कार्यरत करण्यात येतील, असे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण म्हणाले. जिल्हा परिषदेत जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत चव्हाण बोलत होते. बैठकीस जि. प. सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत खरात, प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणीपुरवठा व स्वच्छता आप्पासाहेब गुजर, सहायक वनसंरक्षक आशुतोष शेंडगे, जलबिरादरी महाराष्ट्र अध्यक्ष नरेंद्र चुग, सदस्य सुमंत पांडे आदी उपस्थित होते. श्री. चव्हाण म्हणाले, ह्यचला जाणूया नदीलाह्न या अभियानासाठी जलबिरादरीला जिल्हा परिषदेचे सर्व ते सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. नदी यात्रा झाल्यानंतर प्राप्त सर्वंकष अहवालांच्या अनुषंगाने नदी पुनरुज्जीवनासाठी सुचविण्यात आलेल्या उपाययोजना राबविण्यास प्राधान्य दिले जाईल, असेही ते म्हणाले. नदी प्रवाही करण्यासाठी नदीला येऊन मिळणारे सर्व नाले, संरचना खुल्या करुन प्रवाहित करणे गरजेचे आहे; विविध नद्यांच्या पुनुरुज्जीवन प्रकल्पांमध्ये ही बाब प्रकर्षाने लक्षात आली असून त्यानुसार उपाययोजना करण्यात आल्याचे ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह म्हणाले. बैठकीत चुग, पांडे यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे महाराष्ट्रात या अभियानांतर्गत काढण्यात आलेल्या नदी यात्रा तसेच विविध नद्यांच्या पुनरुज्जीवनाच्या दृष्टीने विविध जिल्ह्यात राबविण्यात आलेले उपक्रम व नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांची माहिती दिली. अभियानात प्रत्येक नदीसाठी नदी प्रहरी नेमण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. जिल्ह्यात एकूण ११ नद्या या अभियानात समाविष्ट असून पवना नदी तसेच इंद्रायणी नदी यात्रा पूर्ण झाली असल्याचे चुग यांनी सांगितले. या दोन नद्यांच्या अनुषंगाने सद्यस्थिती आणि आवश्यक उपाययोजनांचा सर्वंकष अहवाल तयार केला असल्याचेही ते म्हणाले. बैठकीत विविध अभियानाचे सदस्य तसेच उपस्थित नदी प्रहरी यांनी विविध सूचना केल्या. जि. प. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमीत पाथरवड, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. विष्णू गर्जे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रवीण कोरगंटीवार आदी यावेळी उपस्थित होते.

# रावेतमध्ये निवासी शाळेतील अल्पवयीन मुलीवर अत्याचार;

## संचालकासह माजी विद्यार्थिनी अटकेत

**पिंपरी :** रावेत येथील क्रिएटिव्ह ॲकॅडमी या निवासी शाळेतील दहावीच्या विद्याथिनीवर संचालकानेच लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी संचालक नौशाद अहमद शेख (वय ५८) आणि त्याला मदत करणाऱ्या शाळेच्या माजी विद्याथिनीला पोलिसांनी अटक केली आहे. १६ वर्षीय पीडित मुलीच्या वडिलांनी रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

शेख हा रावेत येथे क्रिएटिव्ह ॅकॅडमी ही निवासी शाळा चालवतो. २०२१ मध्ये पीडित मुलीच्या वडिलांनी तिला नववीमध्ये या निवासी शाळेत दोन लाख २६ हजार रुपये भरून प्रवेश घेऊन दिला. शाळेतील मुलींच्या वसतिगृह इमारतीच्या पहिल्या मजल्यावर शेख राहतो. त्याने पीडित मुलीला २०२२ मध्ये सदनिकेत बोलावून विनयभंग करून मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न केला, तेव्हा तिने विरोध केला. त्यानंतर ह्यतुज्या घरच्यांना फोन करून तुझे येथील मुलांबरोबर संबंध असल्याचे सांगेनह्न असे तो धमकावू लागला. दिवाळीच्या सुट्टीतही अत्याचाराचा प्रयत्न केला. एका माजी विद्याथिनीनेही पीडित मुलीला शेखसोबत संबंध प्रस्थापित करण्याबाबत दबाव आणला, असे फिर्यादीत म्हटले आहे. दोन वर्षे हा प्रकार सुरू होता. त्यामुळे घाबरल्याने मुलगी तेथे राहण्यास तयार नव्हती. तिला आई-वडिलांनी गावाकडे नेले. अखेर तिने ११ जानेवारी २०२४ रोजी याबाबत आई-वडिलांना सांगितले. या गुन्ह्यात पीडितांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस आयुक्तांनी तपासासाठी गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक वनिता धुमाळ यांची विशेष तपास अधिकारी म्हणून नेमणूक केली असल्याचे पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे यांनी सांगितले.

## 'आपला संकल्प, विकसित भारत' योजना

# भाजपकडून शेवाळेवाडीत जनजागृती

**हडपसर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या विविध योजनांची माहिती शेवाळेवाडीत जनजागृती करीत विविध योजनांचा प्रसार करण्यात आला.

आपला संकल्प, विकसित भारतह्न या संकल्प यात्रेचं विकसित भारत विविध माहितीची शेवाळेवाडी येथे माहिती जनजागरण करीत माहिती देण्यात आली. यावेळी भाजप पुणे जिल्हा सरचिटणीस राहुल शेवाळे यांनी ग्रामस्थांना यात्रेची माहिती देणारी वार्षिक दिनदशिर्का भेट दिली.



शेवाळेवाडीत आपला संकल्प, विकसित भारतह्न संकल्प यात्रेच्या निमित्ताने वार्षिक दिनदशिर्का ग्रामस्थांना देताना राहुल शेवाळे.

ह्यआपला संकल्प, विकसित भारतह्न या संकल्प यात्रेची शेवाळेवाडी येथे राहुल शेवाळे यांनी माहिती पुस्तिका तसेच दिनदशिर्का ग्रामस्थांना भेट दिली. त्याचे ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात आले. यावेळी राजेंद्र घुले, बाळासाहेब भंडारी, अण्णा जाधव, सोमनाथ बागवे, यश अवचर, सचिन मिंढे, रोहिदास बनकर, करण सलगर व ग्रामस्थ उपस्थित होते.

# १३ फेब्रुवारी पासून कोयना प्रकल्पग्रस्तांचा विजयोत्सव किंवा बेमुदत ठिय्या आंदोलन

**पाटण /संजय कांबळे**

पुनर्वसन मंत्री यांनी कोयना प्रकल्पग्रस्तांची बैठक त्यांच्या प्रशासकीय अपरिहार्य कारणामुळे रद्द केलेली बैठक तारीख १२ फेब्रुवारी पर्यंत घेऊन विषय पत्रिकेतील इतर विषयांच्यासह पसंती दिलेल्या जमिनी वाटपास सुरुवात केली नाही तर १३ फेब्रुवारी रोजी हजारो कोयना धरणग्रस्त स्त्री-पुरुष बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु करणार असा इशारा कोयना धरणग्रस्तांनी मेळाव्यात सरकारला दिला.

या मेळाव्यात श्रमिक मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर म्हणाले की, १३ फेब्रुवारी रोजी कोयना धरणग्रस्तांचा एक तर विजयोत्सव तरी होईल किंवा निर्णायक लढा तरी सुरू होईल.

२०१८ पासून पाच वेळा बेमुदत आंदोलने या कोयना प्रकल्पग्रस्तांनी केले, त्याच्या परिणामी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्या पातळीवर बैठका होऊन जमीन पसंती केल्या, त्यास आज आठ ते अकरा महिने पूर्ण झाले आहेत. तरीसुद्धा आजतागायत जमीन वाटप सुरू केलेले नाही.

डॉ. पाटणकर असेही म्हणाले की, ६५ वर्षे या जनतेला वनवास भोगावा लागला आहे. आता कुठे लढा, आंदोलने करून प्रश्न सोडवणूक होण्याला सुरुवात होत असताना प्रशासन आणि शासन चालढकल करण्यातच धन्यता मानत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे जनतेला लढण्याशिवाय पर्याय नाही. सरकार जर लढल्याशिवाय पुढे सरकणार नसेल तर आम्ही लढू पण आता माघार घेणार नाही.

हरिश्चंद्र दळवी यांनी सुरुवातीपासून कोयना धरणग्रस्तांच्या लढ्याचा इतिहास सांगून आता सरकारला नडगा दाखवल्या शिवाय गूढगे टेकणार नाही असे म्हणाले.

यावेळी प्रास्ताविक महेश शेलार यांनी केले. श्रीपती माने,निवृत्ती सपकाळ यांनी मनोगत व्यक्त केले.

मेळाव्यास संतोष गोटल, सचिन कदम, राम कदम, पी.डी. लाड, सीताराम पवार, किसन सुतार, विनायक शेलार, शिवाजी कांबळे, महादेव यादव, परशुराम शिर्के, जयराम कांबळे, दाजी पाटील, राजाराम जाधव, अनुसया कदम, गाजराबाई खराडे, शुभांगी लाड, विमल सुतार, उपस्थित होते.

# कुरिअर वाहन दरोड्यातील ६०० ग्रॅम सोने, ३० किलो चांदी जप्त

**नाशिक -** इगतपुरी तालुक्यातील मुंढेगाव शिवारात काही दिवसांपूर्वी कुरिअर वाहनावर पडलेल्या दरोड्यातील आणखी ६०० ग्रॅम सोने व ३० किलो चांदी हस्तगत करत आरोपींच्या वाहन चालकास चांदवड येथून अटक करण्यात आली आहे.

मुंबई येथील जय बजरंग कुरिअर सर्व्हिसच्या वाहनावर इगतपुरी तालुक्यातील मुंढेगाव शिवारात पाच ते सहा संशयितांनी दरोडा टाकला होता. या वाहनातून सोने आणि चांदीच्या दागिन्यांची वाहतूक करण्यात येत होती. दरोड्यात साडेचार किलो सोन्याचे दागिने, बिस्कीट आणि १३५ किलो चांदीचे दागिने व विटा याप्रमाणे तीन कोटी ६७ लाख ५५ हजार रुपयांच्या मुद्देमालाची लूट करण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखा आणि घोटी पोलिसांनी आग्रा जिल्ह्यातील खेरागड, इटौरा परिसरातून देवेंद्रसिंग उर्फ करवा परमार, आकाश परमार, माजी सैनिक हुबसिंग ठाकूर, फळ विक्रेता शिवसिंग ठाकूर, माजी सैनिक जहिर खान यांना मागील आठवड्यात ताब्यात घेतले. त्यांच्याकडून २.५ किलो सोन्याचे दागिने आणि ४५ किलो चांदीचे दागिने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संशयितांना न्यायालयाने नऊ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती.

दरम्यान, या गुन्ह्यातील तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखा तसेच घोटी पोलिसांचे पथक आग्रा येथे पुन्हा गेले होते. आग्रा येथून पथकाने ५९६ ग्रॅम सोने, २९.७४६ किलो चांदीचे दागिने हस्तगत केले. तसेच गुन्ह्यात वापरलेल्या वाहनाचा चालक नंदकिशोर गारे (४५. रा. चांदवड) याला देखील पोलिसांनी अटक केली आहे. आतापर्यंत पोलिसांनी तीन किलो ९५ ग्रॅम सोने, ७५ किलो ५२३ ग्रॅम चांदीचे दागिने असा दोन कोटी ६० लाख ६६ हजार १९६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. उर्वरित संशयित आणि मालाचा शोध घेण्यात येत आहे.

# इट्स अ रॅप अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफच्या 'बडे मियाँ छोटे मियाँ ' जॉर्डन शूट संपूर्ण !



बॉलीवूडचा तरुण ॲक्शन सुपरस्टार टायगर श्रॉफ आणि अक्षय कुमार या सुपरहिट जोडीचा ॲक्शन चित्रपट चित्रपट बडे मियाँ छोटे मियाँ या चित्रपटाचं चित्रीकरण पूर्ण झालं आहे. जॉर्डनमध्ये चित्रपटाच्या निमिती प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण पार पडला आहे. अभिनेत्याने त्याच्या सोशल मीडिया वर खास पोस्ट करून क्रू सोबतचा एक फोटो शेअर केला आहे.

जॉर्डनमधील डेड सी इथला बेस्ट फोटो #BadeMiyanChoteMiyan च्या संस्मरणीय वेळापत्रकाचा शेवट आम्ही अशा प्रकारे साजरा केला. हे एक 'रॅप' आहे !

टायगर इफेक्ट पूर्ण ताकदीने चाहत्यांना रोमांचक ॲक्शन सीक्वेन्स आणि आश्चर्यकारक स्टंट्सची अपेक्षा आहे जी बॉलीवूडचा सर्वात तरुण ॲक्शन हिरो टायगरची अविश्वसनीय प्रतिभा आणि त्याच्या कलेबद्दलचे समर्पण, तसेच बडे मियाँ छोटे मियाँ मधील अक्षय कुमारच्या अनुभवी स्टंट चातुर्याला हायलाइट करेल. अली अब्बास जफर लिखित आणि दिग्दर्शित आणि पूजा एंटरटेनमेंट आणि अअे फिल्म्सच्या बॅनरखाली जफर, जॅकी भगनानी, वाशू भगनानी, दीपशिखा देशमुख आणि हिमांशू किशन मेहरा यांनी निर्मित केला आहे.

# पिंपरी- चिंचवडमध्ये पोलीस अधिकाऱ्यांच्या घाऊक बदल्या,

## २७ पैकी १९ अधिकारी नागपूरचे

**पिंपरी- चिंचवड :** गृहखात्याने आगामी लोकसभेच्या पाश्वर्भूमीवर राज्यातील १३० पोलीस निरीक्षकांच्या बदल्या केल्या आहेत. एकट्या पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयातील २७ जणांचा यात समावेश आहे. तर, नागपूर शहरातून पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयात तब्बल १९ पोलीस निरीक्षक बदलून आले आहेत. त्यामुळं अनेकांच्या राजकीयदृष्ट्या भुवया उंचावल्या आहेत. या बदल्यांमागे राजकीय हस्तक्षेप असल्याची पोलीस आयुक्तालयात चर्चा आहे.

पिंपरी चिंचवड हा अद्यापही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला मानला जातो. अजित पवार हे महायुतीत सहभागी आहेत. असं असलं तरी गृहखाते मात्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे.



नागपूर शहरातून १९ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयात झाल्याने अनेक तर्क वितर्क लढवले जात आहेत. आगामी लोकसभा, विधानसभा आणि महानगरपालिका निवडणूका होणार आहेत. याच पाश्वर्भूमीवर नागपूर येथील १९ पीआय पिंपरी- चिंचवड शहरात आणले आहेत का? असा प्रश्न विचारला जातो आहे. तर, पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालतील २७ जण जिल्ह्याबाहेर पाठवण्यात आले आहे. त्यांनी या बदल्यांबाबत उघड नाराजी व्यक्त केली आहे.

महायुतीत असलेल्या अजित पवारांचा बालेकिल्ला पुन्हा काबीज करायचा आहे का? त्या दृष्टीने राजकीय गणिते सुरू आहेत का? अशी चर्चा सुरू आहे. आधीच पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात राजकीय हस्तक्षेप वाढला आहे. अनेक वरिष्ठ अधिकारी दबक्या आवाजात बोलताना दिसतात. मजीतील अधिकारी आणण्यासाठी वरिष्ठांवर राजकीय दबाव टाकला जातो आहे. असं पोलीस सूत्र सांगतात. राजकीय हस्तक्षेप होत असल्याने पोलीस अधिकाऱ्यांनी देखील नाराजी व्यक्त केली आहे. एकीकडे आड तर दुसरीकडे विहीर अशी स्थिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची झाली आहे.

# ओव्हर हेड वायरचा धक्का लागून मुलगा गंभीर जखमी

**कल्याण :** येथील पूर्व भागातील मालगाड्यांचा थांबा असलेल्या ठिकाणी खेळण्यासाठी आलेला एका १३ वर्षाचा मुलगा मंगळवारी दुपारी खेळताना यार्डातील एका मालगाडीवर चढला. वरील ओव्हर हेड वायरशी त्याचा संपर्क आल्याने त्याला विजेचा जोराचा धक्का बसून तो गंभीर जखमी झाला. त्याच्यावर मुंबईतील शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

खडेगोळवली भागात राहणारा समीर बेग (१३) हा मुलगा शाळा सुटल्यावर घरी आला. आपण कबड्डी खेळण्यास जात आहे असे सांगून तो रेल्वे यार्डात आला. तेथे मालगाड्या थांबलेल्या होत्या. एका मालगाडीच्या टपावर समीर चढला. जिवंत ओव्हर हेड वायरशी त्याचा संपर्क आल्याने त्याला विजेचा जोरदार धक्का बसून तो जागीच कोसळला. तो ८० टक्के होरपळला आहे.लोहमार्ग पोलिसांना ही माहिती मिळताच त्याला पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात नेण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार करून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने मुंबईत हलविण्यात आले. कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे.

## निवडक महामुंबई

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डोळ्यावर एक शस्त्रक्रिया झाली आहे. डोळ्याचा त्रास होत असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोळ्याची तपासणी केली होती. त्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांच्यावर लेझर ट्रिटमेंटद्वारे शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सकाळी नऊ वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डोळ्यावर यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. त्यानंतर मुख्यमंत्री शिंदे आपल्या ठाण्याच्या घरी परतले आहेत. शस्त्रक्रियेनंतर काही काळ विश्रांतीचा सल्ला डॉक्टरांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिला आहे.

### मराठा सर्वेक्षणात आरोग्य सेविकेला मारहाण

**मुंबई :** २३ जानेवारीपासून मुंबईत मराठा सर्वेक्षणाला सुरुवात झाली असून सर्वेक्षण करणाऱ्या पालिका कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यात वांद्रे येथे मराठा सर्वेक्षणात आरोग्य सेविकेला मारहाण झाल्याचे आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेकडून सांगण्यात आले. दरम्यान, या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले. दरम्यान, मारहाण करणाऱ्यांना त्वरित अटक करण्यात यावी, अशी मागणी आरोग्यसेवा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अॅड. प्रकाश देवदास यांनी केली आहे. मराठा सर्वेक्षणासाठी पालिकेच्या विविध विभागांतील ३० हजार कर्मचाऱ्यांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मात्र या सर्वेक्षणात सार्वजनिक आरोग्य खात्याकडून जबरदस्ती केली जाते. सर्वेक्षणावेळी डॉक्टर्स व महिला आरोग्यसेविका वर नागरिकांकडून हल्ले होत असून, अपमान केला जात आहे. पालिका प्रशासन महिला डॉक्टर्स, महिला आरोग्य सेविकांना संरक्षण देवू शकत नसेल, तर सर्वेक्षण बंद करावे व ज्यांनी मारहाण केली, त्यांना त्वरित अटक करण्यात यावी, अशी मागणी केल्याचे अॅड. प्रकाश देवदास म्हणाले.

### वृत्तपत्र विक्रेत्याला मिळाली डॉक्टरेट



**मुंबई :** अंधेरी येथील हॉटेल कोहिनूर कॉन्टिनेन्टलमध्ये २४ जानेवारी रोजी एम्पॉवर सोशल अँड एज्युकेशन ट्रस्ट आयोजित ११ वा भारत निर्माण योगदान अवॉर्ड २०२४ या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात लोअर परळ विभागातील वृत्तपत्र विक्रेते डॉ. नीलेश मानकर यांना सामाजिक क्षेत्रातील केलेल्या कार्याबद्दल 'सोशल वर्कर' ही पदवी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी लोअर परळ वृत्तपत्र विक्रेत्या संघाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी अमेरिकन युनिव्हर्सिटीचे संस्थापक आणि चेअरमन मधु किशन यांना आमंत्रित केले होते. त्याचप्रमाणे या कार्यक्रमासाठी भारताच्या कोनाकोपऱ्यातून विविध मान्यवर उपस्थित होते. मॅनेजिंग ट्रस्टी डॉ. घनश्याम कोळंबे यांनी सर्वांचे आभार मानले.

### शॉर्ट फिल्मसाठी लेखकाची साडेपाच लाखांची फसवणूक

**मुंबई :** शॉर्ट फिल्मसाठी एका लेखकांची साडेपाच लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध ओशिवरा पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. मनोज खाडे, धनंजय मान, रोहित यादव आदित्य चौधरी अशी या चौघांची नावे असून, पळून गेलेल्या या चौघांच्या अटकेसाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. तक्रारदार फिल्ममेकिंगचे काम करून ते कथा लेखक म्हणूनही काम करतात. नोव्हेंबर २०२२ रोजी त्यांची फेसबुकवरून संतोष गुप्ताशी ओळख झाली होती. तो एका निर्मात्याच्या फेसबुक ग्रुपमध्ये होता, त्यामुळे त्यांनी त्याला ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी अॅप्रुव्हल देण्यासाठी विनंती केली होती. त्याच्याच माध्यमातून त्यांची इतर चारही आरोपींशी ओळख झाली होती. त्यांना एका शॉर्ट फिल्मसाठी फायनान्सची गरज असल्याने रोहितने त्यांची ओळख फॉक्स व्हिजन फिल्मचे मालक धनंजय मान आणि मनोज खाडेशी करून दिली होती. त्यानंतर त्यांच्यात एक बैठक झाली होती. ते निर्माता-दिग्दर्शक असलेल्या एका शॉर्ट फिल्मसाठी त्यांना बारा लाखांचे फायनान्स आणि अॅग्रिमेंटवर ही फिल्म रिलीज करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामोबदल्यात त्यांना २५ टक्के कमिशन मिळण्याचा एक करार झाला होता. त्यानंतर त्यांनी एक मुलाकात नावाच्या शॉर्ट फिल्मची तयारी सुरू केली होती.

# तीन लाख कारागिरांना मुख्य प्रवाहात आणणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : विश्वकर्मा योजनेच्या १०१ कौशल्य केंद्रांचा शुभारंभ

**प्रतिनिधी/मुंबई**

पारंपरिक कारागीर आणि हस्तकलेला ओळख प्राप्त करून देणारी पी. एम. विश्वकर्मा सन्मान योजना नरेंद्र मोदी यांनी देशात सुरू केली आहे. महाराष्ट्र या सन्मान योजनेतही अग्रेसर राहील, असा विश्वास व्यक्त करत या योजनेंतर्गत २०२८ पर्यंत तीन लाख कारागिरांना विकासाच्या प्रवाहात आणणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे दिली.

एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृह येथे पी. एम. विश्वकर्मा कौशल्य योजनेंतर्गत राज्यातील १०१ केंद्रांचा शुभारंभ रिमोटद्वारे करण्यात आला. यावेळी बोलताना शिंदे यांनी पी. एम. विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेतून राज्यात नवनवीन स्टार्टअपही सुरू व्हावीत आणि या स्टार्टअपनी जागतिक स्पर्धेत उतरावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. पी. एम. विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेच्या पहिल्या टप्प्यात १५ जिल्ह्यांतील १०१ तुकड्यांना आपण प्रशिक्षण देत आहोत. आगामी काळात अन्य जिल्ह्यांतही या प्रशिक्षणाचा विस्तार करण्यात येईल आणि त्याला सर्वतोपरी पाठबळ दिले जाईल, असे शिंदे यांनी सांगितले.

राज्यात कौशल्य विकासासाठी मुंबईसह नागपूर, पुणे येथे कौशल्य विकास विद्यापीठ सुरू केली आहेत. राज्यात नमो रोजगार



अभियानांतर्गत नमो महारोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. नागपूरमध्ये मेळावा आयोजित केला होता. लवकरच ठाण्यामध्ये हा मेळावा होईल. महाराष्ट्र हे उद्योगाभिमुख, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि प्राधान्य देणारे राज्य आहे. त्यामुळेच राज्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक येत आहे. दावोसमध्ये ३ लाख ८३ हजार कोटींचे सामंजस्य करार केले असून यातून अनेक रोजगार निर्माण होतील, असा विश्वास शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या आयुक्त निधी चौधरी, महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमला, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी वेद मनी, केंद्रीय कौशल्य विकास विभागाचे सचिव अतुल तिवारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. कार्यक्रमाला कौशल्य विकास विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक दिगांबर दळवी, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण मंडळाचे संचालक योगेश पाटील, राज्यातील १५ जिल्ह्यांतील स्थानिक लोकप्रतिनिधी, विश्वकर्मा केंद्रांचे संचालक, स्थानिक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अधिकारी, प्रशिक्षणार्थी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# मी काँग्रेससोबतच!

## आमदार झिशान सिद्दीकी यांचे स्पष्टीकरण

**विशेष प्रतिनिधी/मुंबई**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय गणित घालण्याचे काम वेगात सुरू आहे. यानिमित्ताने विधानसभेचीही आखणी केली जात आहे. विशेषतः सत्तेच्या जोरावर विरोधकांना जाळ्यात ओढण्याचे काम वेगात सुरू आहे. त्यातल्या त्यात महायुतीचे मुंबईवर अधिक लक्ष आहे. या अगोदर माजी खासदार मिलिंद देवरा यांना शिंदे गटात घेऊन काँग्रेसला धक्का दिला. आता काँग्रेस आमदार झिशान सिद्दीकी यांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न आहे. त्यांचे वडील बाबा सिद्दीकी अजित पवार गटात जाणार असल्याचे बोलले जात होते. दरम्यान, आमदार झिशान सिद्दीकी यांनी आपण काँग्रेससमधेच असल्याचे स्पष्टीकरण दिले. त्यामुळे तूर्त यावर पडदा पडला आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दीकी अजित पवार गटात जाणार असल्याचे बोलले जात होते. त्यामुळे त्यांच्यासोबत काँग्रेस आमदार झिशान सिद्दीकीदेखील जाणार का, यावरून चर्चा रंगली होती. त्यामुळे मुंबईत काँग्रेसला आणखी एक धक्का बसतो की काय, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. परंतु, आता खुद्द आमदार झिशान सिद्दीकी आपण काँग्रेस सोडून कुठेही जाणार नाही, असे म्हटले. त्यामुळे तूर्त तरी या चर्चेवर पडदा पडला आहे. यावेळी सिद्दीकी यांनी, आमचे अजित पवार यांच्यासोबत कौटुंबिक संबंध आहेत. त्यांनी मला नेहमीच मदत केली आहे. यापुढेही ते मला मदत करीत राहतील. याचा अर्थ आम्ही त्यांच्या गटात जाणार असल्याची चर्चा चुकीची आहे, असेही ते म्हणाले. बाबा सिद्दीकींबाबत आमदार सिद्दीकी यांना विचारले असता मी फक्त स्वतःबद्दल सांगू शकतो. वडिलांची काय भूमिका आहे, ती त्यांना जाऊन विचारा, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, बाबा सिद्दीकी यांनी आगामी काळात काहीही होऊ शकते. असे सांगून ते अजित पवार गटाची वाट सुकर करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, काँग्रेसने याबाबत सावध पवित्रा घेतला आहे.

# यंदा चांगला पाऊस पडणार

**भारतीय हवामान खात्याचा अंदाज**

**पुणे :** प्रशांत महासागरात सक्रिय असलेली एल-निनोची स्थिती फेब्रुवारी महिन्यातही सक्रिय राहण्याचा अंदाज आहे. मात्र, फेब्रुवारीनंतर एल-निनोची स्थिती हळूहळू कमजोर पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता वाढली आहे.

भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत महासागरात एल-निनोची स्थिती कायम आहे. तेथील समुद्रातील पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा जास्तच आहे. फेब्रुवारीअखेरपर्यंत ही स्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे. फेब्रुवारीनंतर एल-निनो स्थिती हळूहळू कमजोर पडण्याचा अंदाज आहे. तसे झाल्यास यंदाच्या पावसाळ्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता वाढली आहे. तसेच हिंदी महासागरातील द्वि-ध्रुविताही सध्या सक्रिय आहे. पुढील एक-दोन महिन्यांत ही स्थिती तटस्थ अवस्थेत पोहचण्याची शक्यता आहे.

फेब्रुवारी महिन्यात देशभरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याचा अंदाज आहे. फेब्रुवारी महिन्यात देशभरात सरासरी २२.७ मिमी पाऊस पडतो, सरासरीच्या तुलनेत ११९ टक्के पावसाचा अंदाज आहे. राज्यात प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

मागील वर्षभर किमान तापमान सरासरीपेक्षा जास्तच राहिले होते. जानेवारी महिन्यात किमान तापमान सरासरीपेक्षा एक ते तीन अंश सेल्सिअसने जास्त राहिले आहे. फेब्रुवारी महिन्यातही किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. कमाल तापमान देशभरात जास्त राहण्याचा अंदाज आहे. मात्र, राज्यात मुंबई, किनारपट्टी वगळता कमाल तापमान सरासरी इतकेच राहण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी महिन्यात उत्तर भारतात थंडीची लाट येण्याची शक्यता कमीच आहे.

## गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याच्या आमिषाने फसवणूक

**मुंबई :** गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याच्या आमिषाने एका जोडप्याला सुमारे ७२ लाखांना गंडा घालणाऱ्या कोल्हापूरच्या तीन भामट्यांविरुद्ध कसतुरबा मार्ग पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. देशभूषण बळवंत देशमाने, प्रितम देशभूषण देशमाने आणि राजेंद्र भीमराव नेर्लीकर अशी या तिघांची नावे असून ते तिघेही कोल्हापूरच्या उत्तर आजरा आणि हुपरीचे रहिवाशी असल्याचे पोलिसांनी सांगितले. मीनल धनपाल सेठ ही महिला बोरिवली येथे राहत तिचे पती एका खासगी कंपनीत कामाला आहेत. २०२१ साली ती तिच्या पतीसोबत कर्नाटकच्या हुबली येथील जैन मंदिरात गेली होती. तिथेच त्यांची ओळख जैन मुनी नमित सागरजी महाराज यांच्याशी झाली होती. त्यांनी अनेकदा त्यांना कौटुंबिक जीवनाबाबत चांगले मार्गदर्शन केले होते. त्यामुळे ते नियमित जैन मंदिरात दर्शनासाठी जात होते. दोन वर्षांपूर्वी महाराजांनी त्यांची ओळख देशभूषण व त्यांचा मुलगा प्रितम, राजेंद्रशी करून दिली होती. ते तिघेही कोल्हापूरचे रहिवाशी असून, ते तिघेही महाराजांचे भक्त आहेत. या ओळखीतून त्यांनी ते बडे गुंतवणूकदार असून, त्यांचा फॉरेक्स ट्रेडिंगचा व्यवसाय आहे.

# मराठा सर्वेक्षणाला आव्हान देणार

**मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य लक्ष्मण हाके यांचा इशारा**

**लक्ष्मण हाके यांना धमक्या**

मराठा आरक्षणाच्या विरोधात भूमिका घेतल्यामुळे प्रा. लक्ष्मण हाके यांना धमकीचे फोन येत आहेत. त्यांना जीवे मारण्याचे कॉल येत आहेत. यासंदर्भात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पोलीस आयुक्त यांच्याकडे तक्रार दाखल केल्याचे त्यांनी सांगितले.

**पुणे :** मराठा आरक्षणासाठी राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या सर्वेक्षणाला न्यायालयात आव्हान देणार असल्याचे आयोगाचे माजी सदस्य लक्ष्मण हाके यांनी शुक्रवारी सांगितले.

मनोज जरांगे यांच्या मागणीनुसार, कुणबी प्रमाणपत्रे देऊन मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिले जात आहे. मराठा समाजातील ज्या व्यक्तींकडे कुणबी प्रमाणपत्रे असतील त्यांच्या सग्यासोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्रे मिळण्याची अधिसूचना शासनाने काढली आहे. त्याचवेळी मागासवर्ग आयोगाकडून मराठा समाजाचे सर्वेक्षण २३ जानेवारीपासून सुरू करण्यात आले. हे सर्वेक्षण शुक्रवारी पूर्ण झाले. त्याचा अहवाल लवकरच येणार आहे. परंतु, या अहवालास न्यायालयात आव्हान देण्याचा इशारा राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य लक्ष्मण हाके यांनी दिला आहे.

हाके म्हणाले, राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल हा खोटा आहे. या अहवालाला चॅलेंज करणार आहोत. मुंबई हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टात या अहवालास आव्हान दिले जाणार आहे. या अहवालाच्या आधारे सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणसंदर्भातील क्युरेटिव्ह पिटीशनच्या वेळी बाजू मांडण्यात येणार आहे. परंतु, त्या अहवालास आव्हान दिले गेल्यास सरकारपुढे अडचणी निर्माण होणार आहेत.

मराठा आरक्षणासाठी मुंबईतील ३९ लाख कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यासाठी मुंबई मनपाचे ३० हजार कर्मचारी शहर आणि उपनगर जिल्ह्यात घरोघरी फिरून सर्वेक्षण करत आहेत. अगदी सुट्टीच्या दिवशीही हे सर्वेक्षण करण्यात आले. खुल्या गटातील किंवा आरक्षणाचा लाभ नसलेल्या कुटुंबाला पूर्ण १६० प्रश्न विचारून त्यांची अँपवर स्वाक्षरी घेण्याची प्रक्रिया करण्यात आली.

# सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती द्या!

## ५१ सहायक पोलीस निरीक्षक हायकोर्टात



**मुंबई/प्रतिनिधी :** 'मॅट'च्या आदेशाची ढाल करून सेवाज्येष्ठता असूनही पोलीस निरीक्षक पदावर बढती देण्यापासून वंचित ठेवलेल्या महाराष्ट्र पोलीस दलातील अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील ५१ सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. आम्हाला आरक्षणाच्या आधारे नाही तर सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती द्या, अशी मागणी करत राज्य सरकारच्या धोरणासह 'मॅट'च्या आदेशाला आव्हान दिले आहे.

या याचिकेची न्या. अतुल चांदुरकर आणि न्या. जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने गंभीर दखल घेतली. या प्रकरणाची सुनावणी ५ फेब्रुवारीला सुनावणी निश्चित केली आहे.

सेवाज्येष्ठता असूनही पदोन्नतीपासून वंचित राहिलेल्या आणि महाराष्ट्र पोलीस दलातील अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील ५१ सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी उच्च न्यायालयात धाव घेत ज्येष्ठ वकील सुरेश माने यांच्यामार्फत रिट याचिका दाखल केली आहे.

या याचिकेवर न्या. अतुल चांदुरकर आणि न्या. जितेंद्र जैन यांच्या खंडपीठासमोर प्राथमिक सुनावणी झाली. यावेळी अॅड. अनिल साखरे यांनी याचिकाकर्ते ५१ सहाय्यक पोलीस निरीक्षक हे १०२ च्या बॅचचे अधिकारी आहेत.

राज्यभरातील विविध पोलीस ठाण्यांत १० वर्षांपासून एकाच पदावर कार्यरत आहेत. सरकारने सेवाज्येष्ठतेचा विचार करून पदोन्नती द्यायला हवी होती. मात्र तसे न करता 'मॅट'च्या ८ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या आदेशाचे पुढे करून पदोन्नतीपासून वंचित ठेवले आहे. हा अन्याय आहे, असा दावा त्यांनी केला. तसेच सरकारचे चुकीचे धोरण आणि 'मॅट'च्या आदेशाकडे खंडपीठाचे लक्ष वेधले. याची दखल घेत खंडपीठाने राज्य सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश देत याचिकेची ५ फेब्रुवारी रोजी तातडीने सुनावणी घेण्याचे निश्चित केले.

सहाय्यक पोलीस निरीक्षक हे थेट निवड प्रक्रियेतून महाराष्ट्र पोलीस दलाच्या सेवेत दाखल झाले होते. १९९५ च्या पोलीस नियमावलीनुसार त्यांची निवड करण्यात आली होती. त्यांना २०१७ मधील विजय घोगरे प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ देऊन पदोन्नतीपासून वंचित ठेवता येणार नाही, असा दावा याचिकेत केला आहे.

## वकील दाम्पत्याच्या हत्येचा निषेध करीत संघटनांचे आंदोलन




**मुंबई :** वकिलांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या घटना वाढत आहे, त्या थांबाव्यात व अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी येथील राजाराम आढाव (५२) व मनीषा आढाव (४२) या वकील दाम्पत्याचे अपहरण करून हत्या केल्याच्या घटनेच्या निषेधार्थ मुंबईतील शहर सत्र व दिवाणी न्यायालयातील वकिलांच्या संघटनेने शुक्रवारी आझाद मैदानात आंदोलन केले. वकील संरक्षण कायद्याच्या मागणीचे सरकारला वेळोवेळी निवेदन दिले आहे. याबाबत राज्य सरकारकडून ठोस उपाययोजना होत नाही. आता जर मागणी मान्य केली नाही, तर हा मोर्चा मंत्रालयावर घेऊन जाण्याचा आम्ही मागे पुढे पाहणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला.

**अज्ञात व्यक्तीचा गुन्हे शाखेसह एटीएसकडून शोध सुरु**

# मुंबई शहरात सहा ठिकाणी बॉम्बस्फोटाची धमकी

**मुंबई :** शहरात सहा ठिकाणी बॉम्बस्फोट होणार असल्याचा असल्याचा धमकीचा मेसेज मुंबई पोलिसांच्या वाहतूक नियंत्रण कक्षाला प्राप्त झाल्याने पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. या धमकीची वरिष्ठांनी गंभीर दखल घेत सर्वत्र कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत. दरम्यान, धमकीचा मेसेज देणाऱ्या व्यक्तीच्या अटकेसाठी गुन्हे शाखेसह एटीएसने विशेष मोहीम हाती घेतली आहे. गेल्या काही दिवसांत बॉम्बस्फोट होणार असल्याच्या निनावी कॉल आणि मेसेजमुळे मुंबई पोलिसांवर



वाहतूक पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षाला एका बॉम्ब ठेवले असून, या बॉम्बचा कुठल्याही क्षणी स्फोट होईल, असे नमूद करण्यात आले होते; मात्र सहा बॉम्बस्फोट कुठे आणि कधी होणार आहेत, याबाबत काहीच माहिती देण्यात आली नाही. संबंधित व्यक्तीची स्वतःची ओळख सांगितली नाही. ज्या मोबाईल क्रमांकावरून हा मेसेज आला आहे, तो कोड पाकिस्तानाचा असल्याचा संशय व्यक्त होत आहे. ही माहिती नंतर संबंधित पोलिसांनी मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिली होती. या धमकीची वरिष्ठांनी गंभीर दखल घेत मुंबई

# मुलीच्या संरक्षणासाठी धावून आला सुरक्षारक्षक



**सहाय्यक पोलीस आयुक्तांकडून कौतुक**

**मुंबई :** आजही शहरात महिला, मुली असुरक्षित आहेत. याचे जिवंत उदाहरण म्हणजे विक्रोळी येथे घडलेली एक दुर्दैवी घटना होय. रस्त्यावरून जाणाऱ्या एका मुलीला एका पुरुषाने अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला असता त्या नराधमाला एका सुरक्षारक्षकाने आपल्या कर्तव्याचा हिसका दाखवत त्या मुलीला सुरक्षित केले. या घटनेमुळे महाराष्ट्र शासन स्थापित सुरक्षारक्षक मंडळातील सुरक्षारक्षक समीर कोळवणकर यांचे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर उतळे यांनी प्रशंसापत्र देऊन अभिनंदन केले.

नगरच्या दिशेने जात असताना टागोर नगरला जाणाऱ्या रस्त्यावरील बस स्टॉप जवळ एक विकृत पुरुष रस्त्यावरून चालणाऱ्या एका २५ वर्षीय मुलीला पाहून लैंगिक चाळे करून हावभाव करत असताना ती मुलगी घाबरून पळू लागली. तो तिला पकडायला धावला त्यावेळेस सुरक्षारक्षक समीर कोळवणकर यांनी प्रसंगावधान दाखवत त्या मुलीचे संरक्षण केले. पुढील गंभीर घटना कोळवणकर यांच्यामुळे टळली. ही घटना त्यांनी सोशल मीडियावर टाकली होती. तसेच विक्रोळी पोलीस ठाण्यामध्ये आणि डीसीपी ऑफिसला जाऊन लेखी सूचना केली होती. या प्रकरणाची दखल सहाय्यक पोलीस

# मावळातील लोहगड किल्ल्याला मिळणार जागतिक ओळख

**वडगाव मावळ :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांना जागतिक वारसास्थळाचा दर्जा मिळावा, यासाठी केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयानं युनेस्कोला नामांकन पाठवलं आहे.१२ किल्ल्यांच्या यादीत मावळ तालुक्यातील किल्ले लोहगडाचा देखील समावेश आहे. युनेस्कोच्या प्रतिष्ठेच्या व्यासपीठावर मावळ तालुक्यातील किल्ले लोहगडाला नामांकन मिळणं, अत्यंत अभिमानाची बाब आहे



युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट होण्यासाठी प्रत्येक देश नामांकनं पाठवतो. यावर्षी मराठाकालीन किल्ल्यांचा प्रस्ताव भारताकडून युनेस्कोकडं पाठवण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या दुर्गराज रायगडसह साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि तमिळनाडूतील जिंजी किल्ल्याचा या नामांकनामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. हे किल्ले सतराव्या ते एकोणिसाव्या शतकात बांधले गेलेले आहेत. हे किल्ले मराठा सैन्याच्या असामान्य लष्करी व्यवस्थेचा आणि अभेद्य तटबंदीचा भक्कम पुरावा आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, युनेस्कोच्या या यादीत सध्या भारतातील ४२ वारसा स्थळांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये राष्ट्रीय राजधानीचं शहर असणाऱ्या दिल्लीतील तीन सांस्कृतिक स्थळांचा समावेश आहे.

हे नामांकन मावळ तालुक्याच्या दृष्टीने महत्त्वाचा म्हणजे लोहगड किल्ल्याचा समावेश या मानांकनात केला आहे. त्यामुळे लोहगडला खऱ्या अर्थाने वैभव प्राप्त होईल. लोहगड किल्ला व परिसराचा प्रचंड कायापालट होईल. जगभरातून पर्यटक हा किल्ला पाहण्यासाठी येतील अभ्यास करण्यासाठी येतील. नवीन नवीन प्रकल्प या ठिकाणी येतील. मावळचे प्रमुख पर्यटन केंद्र लोहगड होईल. त्यामुळे स्थानिक रोजगार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होईल. व पर्यायाने या परिसराचा विकास होईल.

गडाला नवीन गणेश दरवाजा बसला. पुरातत्व विभागाने तो बसविला. श्री शिवाजी रायगड मंडळ संचालित लोहगड विसापूर विकास मंचाने पुरातत्ववाकडे वेळोवेळी गडाच्या सुधारणांचा पाठपुरावा केला.

पुरातत्व विभागाने चांगली साथ दिली. पुढे गडाला पायऱ्या, बुरुंज तडबंदी याची दुरुस्तीची काम चांगली चालू झाली. त्याचवेळी विसापूर वरील शिव मंदिर जीर्ण होऊन पडल्यानंतर त्याचाही पाठपुरावा मंचाने केला व विसापूर वरील शिवमंदिर पुरातत्व विभागाने बांधले. अशा रीतीने लोहगड विसापूरचा कायापालट होत आहे. म्हणजे गेली २५ वर्षे या ठिकाणी काम करत आहे. लोहगड विसापूरचा विकास हेच मंचाचे प्रमुख ध्येय असल्याचे मंचाचे संस्थापक सचिन टेकवडे यांनी सांगितले.

त्याचबरोबर लोहगड पायथ्याला भव्य असे शिवस्मारक बांधले आहे. त्याच्याभोवती भव्य अशी शिवसृष्टी उभी करायची आहे. या ठिकाणी येणाऱ्या जगभरातील पर्यटकांना शिवरायांचा पराक्रमी इतिहास पाहता आला पाहिजे. व तोच इतिहास त्यांच्याकडून जगभरात पोहोचला जाईल. त्यासाठी शासनाने या ठिकाणी भव्य अशा शिवसृष्टीला मोठी मदत केली पाहिजे. अशी मागणी संस्थापक सचिन टेकवडे यांनी केली. युनोस्को च्या जागतिक वारसा यादीत नामांकनासाठी लोहगडचा समावेश केल्याबद्दल संस्थापक सचिन टेकवडे, मार्गदर्शक संदीप गाडे, अध्यक्ष विश्वास दौंडकर, कार्याध्यक्ष सागर कुंभार,अनिकेत आंबेकर, सचिन निंबाळकर,गणेश उंडे,चेतन जोशी,बसाप्पा भंडारी,अमोल गोरे आणि स्थानिक ग्रामस्थ यांनी आनंद व्यक्त केला.

## श्रीरामकडून १९ कोटी ४७ लाख बँक खात्यावर जमा

### पाचव्या पंधरवड्याचे प्रतिटन ३०५१ रुपये एकरकमी ऊस बील

**फलटण :** कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., हुपरी - यळगुड संचलित श्रीराम सहकारी साखर कारखाना लि., फलटण मध्ये सन २०२३ - २४ या चालू वर्षीच्या हंगामात दि. १ ते १५ जानेवारी दरम्यान गाळपास आलेल्या ६३ हजार ८४६ मे. टन ऊसाला प्रतिटन ३०५१ रुपये प्रमाणे १९ कोटी ४७ लाख ९४ हजार १४६ रुपये एकरकमी, विनाकपात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती प्रोजेक्ट मॅनेजर मानसिंग पाटील यांनी दिली आहे.

सन २०२३-२४ हा यावर्षीचा गळीत हंगाम दि. ३ नोव्हेंबर रोजी सुरु झाला असून दि. २८ जानेवारी अखेर ८७ दिवसात एकूण ३ लाख २६ हजार ६३२ मे. टन ऊसाचे गाळप करुन ३ लाख ५८ हजार ४५० क्विंटल साखर उत्पादन झाले असून सरासरी साखर उतारा ११.०६ टक्के मिळाला आहे.

**२ लाख ८२ हजार टन गाळप**

**यावर्षीच्या हंगामात दि. १५ जानेवारी अखेर २ लाख ८२ हजार १५४ मे. टन ऊसाचे गाळप झाले असून दर १५ दिवसाला प्रतिटन ३०५१ रुपये प्रमाणे विना कपात संपूर्ण रक्कम ८६ कोटी ८ लाख ५१ हजार ८५४ रुपये ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आल्याचे कारखान्याचे चेअरमन डॉ. बाळासाहेब शेंडे यांनी सांगितले.**

## क्राईम

### गुन्हा मागे घेण्यासाठी महिलेला दमदाटी

**कजहाड :** छेडछाडप्रकरणी दाखल केलेला गुन्हा मागे घेण्यासाठी महिलेला दमदाटी करण्यात आली. याप्रकरणी एकावर कजहाडच्या पोलीस उपअधिक्षक कार्यालयातील निर्भया पथकाने कारवाई केली. मलकापुरच्या लाहोटीनगरमध्ये ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मलकापुरच्या लाहोटीनगर परिसरात एका विवाहित महिलेस त्याच परिसरातील संशयीत त्रास देत होता. पिडीत महिलेची छेडछाड करून दमदाटी करत होता. हा प्रकार संबंधित महिलेने पोलीस उपअधिक्षक अमोल ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखालील निर्भया पथकास कळवला. उपअधिक्षक ठाकूर यांनी हा प्रकार गांभियार्ने घेत संशयितावर कारवाईच्या सुचना दिल्या. त्यानुसार संशयीतावर गुन्हा दाखल झाला. मात्र, त्यानंतर काही दिवसातच संशयित पिडीत महिलेस दमदाटी, शिवीगाळ करून गुन्हा मागे घेण्यासाठी दमदाटी करू लागला. हा प्रकार समजताच उपअधिक्षक ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक अमित बाबर, दीपा पाटील, संतोष सपाटे, सागर बर्गे, प्रविण पवार, दिपक कोळी, अमोल फल्ले यांच्यासह उपविभागीय पोलीस पथकाने संशयिताच्या मुसक्या आवळत त्याच्यावर दुसरा गुन्हा दाखल केला. निर्भया पथकाच्या दिपा पाटील यांनी यापुढे असे कोण महिला, मुलींना त्रास देत असेल तर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### पाच बॅटऱ्या अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्या

**औंध :** कळंबी व वडी तालुका खटाव जिल्हा सातारा गावचे हद्दीत असलेल्या जिओ टावर मधील दिड लाख रुपये किंमतीच्या

पाच बॅटऱ्या अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्या. अधिक तपास आर.एस.बनसोडे करीत आहेत.

### राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम प्रभावीपणे राबवा -जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**सातारा :** राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम प्रभावी राबविण्याबरोबरच ज्या शाळांच्या शंभर मीटर परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असेल अशा ठिकाणी कारवाई करा, तंबाखूमुक्त शाळा अभियान राबवा, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, कुष्ठरुग्ण शोध मोहिम व सक्रिय क्षयरुग्ण शोध व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी बोलत होते. या बैठकीला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शबनम मुजावर यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तंबाखूच्या दूष्परिणामाबाबत जागृती करावी, गर्दीची ठिकाणे, एसटी स्टँड, बस स्टॉप, शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, वसतीगृहे आदी ठिकाणी व्यसनमुक्तीपेटी ठेवण्यात यावी. त्याचबरोबर शहरी भागासह ग्रामीण भागात भरारी पथकामाच्या माध्यमातून वेळोवेळी दुकानांना भेटी द्याव्यात, वर्कर्ससाठी आरोग्य तपासणी शिबीर राबवावे. अशा सूचनाही त्यांनी केल्या.

### उद्धव ठाकरेंचे राज्यातील दौरे ही केवळ नौटंकी; महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची उबाठावर टीका

**शिर्डी :** उद्धव ठाकरे यांचे राज्यातील दौरे ही केवळ नौटंकी असून मुख्यमंत्री असतानाही कोकणातील जनतेच्या तोंडाला त्यांनी पाने पुसली होती. पक्ष आणि आमदारही गमावलेल्यांकडे आता फक्त व्यक्तिद्वेषाची भाषणे शिल्लक आहेत. रोज सकाळी उठून बोलण्याचा संजय राऊतांचा वारसा आता उद्धव ठाकरेंनी स्विकारला असल्याची टिका महसूल, पशुसंवर्धन आणि दूग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. दरम्यान मंत्री विखे पाटील यांनी लोणी येथे आपल्या जनसंपर्क कार्यालयात जनता दरबाराच्या निमित्ताने नागरीकांच्या भेटी घेवून त्यांचे प्रश्न जाणून घेतले.

माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, यापूर्वीही उद्धव ठाकरे यांनी कोकणाचे दौरे केले. परंतू तेथील जनतेला ते काही देवू शकले नाहीत.आत्ता ही ते व्यक्तिद्वेषाच्या भाषणापलिकडे काहीही देवू शकणार नाहीत. कारण सत्ता गेल्याच्या वैफल्याने ते ग्रासले आहेत. त्यामुळे त्यांचे व्यक्तिद्वेषाची भाषा कोणालाही ऐकायला आता वेळ नाही. राज्यातील त्यांचे दौरे ही फक्त नौटंकी असून, जनतेसाठी ठाकरे गटाकडे आता कोणताही कार्यक्रम शिल्लक राहीलेला नाही, जनतेलाही ते काही देवू शकणार नाहीत. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी विचारांनी वाढलेला पक्ष उद्धव ठाकरे यांनी केव्हाच गमावला. त्यांच्या पक्षाचे आमदारही त्यांना सोडून गेले. त्यामुळे व्यक्तिद्वेषाच्या भाषणापलिकडे त्यांच्यासकडे काहीही शिल्लाक नाही, असा टोलाही मंत्री विखे पाटील यांनी लगावला.

राज्य सरकारचा मोठा निर्णय

## मनोज जरांगे यांना आता सरकारी सुरक्षा, पोलीस तैनात

**मुंबई :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्याबाबत राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मनोज जरांगे यांच्या सुरक्षेसाठी आता पोलीस तैनात असणार आहे. जरांगे यांना सरकारी सुरक्षा प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आजपासून जरांगे यांच्या सुरक्षेसाठी पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

राज्य गुप्त वार्ता विभागाच्या आदेशाने मनोज जरांगे यांना पोलीस सुरक्षा पुरवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मनोज जरांगे यांच्या सुरक्षेसाठी २४ तास दोन सशस्त्र पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. दरम्यान, त्याआधी सकल मराठा समाजाकडून मुख्यमंत्र्यांकडे मनोज जरांगे यांना सुरक्षा पुरवण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आजपासून दोन कॉन्स्टेबल सुरक्षेसाठी नेमण्यात आले आहेत.

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी गावात २९ ऑगस्ट रोजी आमरण उपोषण सुरु केले होते. या उपोषणस्थळी पोलिसांची लाठीचार्ज झाला आणि त्याचे पडसाद संपूर्ण राज्यभर उमटू लागले. त्यानंतर मनोज जरांगे यांचे आंदोलन संपूर्ण राज्यभरात पोहचले. जोपर्यंत मराठ्यांना आरक्षण मिळणार नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही, अशी भूमिका मनोज जरांगे यांनी घेतली होती. जरांगे यांच्या आंदोलनाने राज्यातील मराठा आरक्षण आंदोलनाचा वणवा पुन्हा एकदा पेटला. मराठा समाजाने आरक्षणासाठी मुंबईवर मोर्चा काढला.

या मुंबई मोर्चाला मोठा प्रतिसाद मिळाला. त्यानंतर नवी मुंबईत आल्यानंतर राज्य सरकारने जरांगे यांना सरकारने आश्वासन दिल्यानंतर मोर्चा स्थगित करण्यात आला.

ओबीसी संघटनांचा विरोध

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्यास काही ओबीसी संघटनांनी विरोध केला आहे. ज्यांच्याकडे कुणबी प्रमाणपत्र आहे, त्यांना ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्यास विरोध नाही. मात्र, ज्यांच्याकडे कुणबी प्रमाणपत्र नाही, अशांना कुणबी प्रमाणपत्र आरक्षण देण्यास ओबीसी संघटनांनी विरोध केला आहे.

सगेसोयरे अध्यादेशाला प्रतिभा धानोरकरांचा कडाडून विरोध

राज्यसरकारने काढलेल्या सगेसोयरे अध्यादेशाला चंद्रपूर जिल्ह्यातील काँग्रेस आमदार प्रतिभा धानोरकर यांनी कडाडून विरोध केलाय. विशेष म्हणजे या अध्यादेशाविरुध्द ७ तारखेला चंद्रपुरात ओबीसी, एसबीसी आणि व्हीजे-एनटी यांचा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चात आमदार धानोरकर यांचा देखील सक्रीय सहभाग असणार आहे. आमदार प्रतिभा धानोरकर यांनी या अध्यादेशाविरुध्द ओबीसी एकवटतील असा इशारा दिला असून लोकसभेत देखील हा मुद्दा गाजणार असल्याचे सूतोवाच केले.

## दलित कार्यकर्त्यांनी साताऱ्यातील आंदोलन निवडणुकीत विसरू नये : दादासाहेब ओव्हाळ

**सातारा :** फुले- शाहू- आंबेडकर यांचे नाव घेऊन सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानतो. त्या सामान्य माणसांना न्याय मिळावा. यासाठी विविध राजकीय पक्ष, वंचित व दलित संघटना व कार्यकर्ते शासकीय कार्यालयात आंदोलन करत असतात. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीच्या काळात ही आंदोलन विसरू नये. असे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए ) राज्य उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांनी सातारा येथे झालेल्या पत्रकार परिषदेत भूमिका मांडली.



सातारा जिल्ह्यात पाच वर्षाच्या कालावधीमध्ये केंद्र व राज्य सरकारने केलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात दीड हजार आंदोलन झालेले आहेत. अनेकांवर पोलीस यंत्रणेने गुन्हे दाखल केलेले आहेत. यामध्ये शासकीय कामात अडथळा आणणे. बेकायदेशीर जमाव जमवून शांतता भंग करणे. तसेच इतर कलमाखाली गुन्हे दाखल केलेले आहेत. ही बाजू शासकीय पातळीवर योग्य असली तरी ज्या कार्यकर्त्यांवर ते गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यांच्या पाठीशी राजकीय पक्ष किंवा सत्ताधारी आणि आता उमेदवार असणारे किंवा उमेदवाराचा प्रचार करणारे प्रति महारथी दलित- कष्टकरी- शेतमजूर- वंचित- अल्पसंख्याक, बहुजन कार्यकर्त्यांना घेऊन प्रचाराच्या जोर बैठका काढत आहेत.

वास्तविक पाहता पाच वर्षाच्या कालावधीमध्ये राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार यांचे लाभार्थी असणारी मंडळी यांनीच खरं म्हणजे त्यांचा प्रचार करून त्यांना निवडून आणणे. आणि पुन्हा त्याचा लाभ घेणे. असा एक कलमी कार्यक्रम गेले पंधरा- वीस वर्षात सुरू केला आहे. पण यामध्ये दलित- शोषित- वंचित कार्यकर्ता मात्र भरकटला गेलेला आहे. ज्यांनी २० वर्षांपूर्वी आपल्या घरावर पत्रे व कौल टाकलेले आहेत. ते पत्रे व कौल त्यांना बदलता आलेली नाहीत .पण लाभार्थी व व्यावसायिक कार्यकर्त्यांनी मात्र आलिशान बंगले बांधले. नवीन गाड्या घेतल्या. आता पुन्हा एकदा गरीब मतदारांना दावणीला बांधण्याचे प्रयोग सुरू केलेले आहेत.

घर का भेदी लंका दहन हे आता कुठेतरी थांबले पाहिजे. यासाठीच वैचारिक भूमिका घेऊन ज्यांनी पाच वर्षात आंदोलन केलेले आहेत. त्यांनी किमान लोकसभा निवडणुकीत स्वाभिमान दाखवावा आणि पाच वर्षात उपस्थित केलेल्या प्रश्नाची उत्तर मागावीत. नंतरच प्रचार उतरावे. अन्यथा दलित- शोषित- कष्टकरी- वंचित समाजातील मतदार त्यांना त्यांची जागा दाखवतील. असेही श्री दादासाहेब ओव्हाळ यांनी मत मांडलेले आहे.

सध्या देश पातळीवर मोठ्या प्रमाणात हुकूमशाही आलेली आहे. निवडणुका जिंकता येतात. याचे नवीन फॉर्मुला तयार केलेला आहे. त्यामुळे लोकशाही धोक्यात आलेली आहे. जर लोकशाही टिकली नाही तर राजकीय पक्ष व कार्यकर्ते टिकणार नाही. ही शेवटची संधी आहे. असं समजून ज्यांनी पाच वर्षात विविध आंदोलन केलेले आहे. किमान त्यांनी तरी या लोकसभा निवडणुकीत उपस्थित केलेल्या प्रश्नाची उत्तर मागावीत. अन्यथा सुज्ञ मतदार एक नवीन क्रांती घडवून आणतील. असेही त्यांनी स्पष्ट केले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय नेते दीपक भाऊ निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसभा निवडणुकीत संपूर्ण ताकद दाखवणार असे त्यांनी सांगितले.


या पत्रकार परिषदेला विविध दलित व कष्टकरी- वंचित समाजातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. किरण बगाडे, दत्ता पवार, मुकुंद माने, नितीन भोपाल, अनिल वापी, रामभाऊ मदळे, सोमनाथ धोत्रे, राजू ओव्हाळ ,सुनील ओव्हाळ, अतुल गरड ,दीपक गाडे, राजेश ओव्हाळ, दत्ता पवार, अमर कांबळे, अतुल गोत पागर, दामिनी निंबाळकर, संजना पोतदार, स्मिता जगताप, सुप्रिया येवले, पवन धायगुडे, संतोष जाधव, सुभाष भिसे इत्यादी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. सर्जेराव बनसोडे यांनी या पत्रकार परिषदेला आभार मानले.

# जागावाटपात रस्सीखेच

## अंतिम निर्णय ३ फेब्रुवारीला दिल्लीत अपेक्षित

**मुंबई :** महाविकास आघाडीतील जागावाटपाच्या बैठकांचे सत्र सुरू असले तरी, आठ ते दहा जागांवर काँग्रेस आणि शिवसेना यांच्यातच रस्सीखेच सुरू आहे. काही जागांचा वाद मिटविण्यासाठी २ फेब्रुवारीला मुंबईत आघाडीची बैठक होणार आहे. त्यानंतर ३ फेब्रुवारीला दिल्लीत होणाऱ्या बैठकीत अंतिम निर्णय होणे अपेक्षित आहे.

जागावाटपाबाबत महाविकास आघाडीतील काँग्रेस, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या प्रमुख तीन पक्षांच्या बैठका सुरू आहेत. आतापर्यंतच्या बैठकांमध्ये राज्यातील ४८ पैकी ३६ ते ३८ जागांवर सहमती झाल्याचे समजते. दहा-बारा जागांचा वाद आहे. त्यापैकी सहा जागांवर काँग्रेस व शिवसेना यांच्यात रस्सीखेच सुरू आहे. मागील लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला फक्त चंद्रपूर या एका जागेवर विजय मिळाला होता. परंतु आता या पक्षाने सर्वाधिक जागांवर दावा केल्याचे कळते. शिवसेनेने जिंकलेले रामटेक, शिर्डी, हिंगोली, दक्षिण मुंबई हे मतदारसंघ काँग्रेसला हवे आहेत. शिवसेना जिंकलेल्या जागा असल्याने त्यावरील हक्क सोडायला तयार नाही. या मतदारसंघातून निवडून आलेले खासदार शिवसेना शिंदे गटात गेले आहेत, त्यामुळे त्या जागा शिवसेना ठाकरे गटाला सोडायला काँग्रेस तयार नाही.



काँग्रेसचा आग्रह त्याचबरोबर भिवंडी मतदारसंघावरही काँग्रेस व शिवसेनेने दावा केला आहे. मागील निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसची युती होती. त्यावेळी अमरावती मतदारसंघ राष्ट्रवादीला देण्यात आला होता. राष्ट्रवादीने अपक्ष उमेदवार नवनीत राणा यांना पाठिबा दिला होता. ही जागा आता राष्ट्रवादीला सोडण्यास काँग्रेस तयार नाही. वर्धा मतदारसंघावरही काँग्रेसने दावा केला आहे. मुंबईत लोकसभेचे सहा मतदारसंघ आहेत. मुंबईतही काँग्रेस व शिवसेना यांच्यातच रस्सीखेच सुरू आहे. मात्र मुंबईतील अधिकच्या जागा शिवसेनेला देऊन इतर विभागातील जास्तीच्या जागा पदरात पाडून घेण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे.

## राज ठाकरेंचा पुन्हा रुद्रावतार

**मुंबई :** टोलच्या झोलवर सातत्याने आक्रमक पवित्रा घेतलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पुन्हा टोलनाक्यावर झालेली गर्दी पाहून स्वत: रस्त्यावर उतरून वाहनांची गर्दी कमी केली. यावेळी हजारोंच्या संख्येनं वाहने नाक्यावर पाहून राज यांचा पारा चांगलाच चढला. त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांची सुद्धा खरडपट्टी केली. आज नाशिक दौऱ्यातही त्यांनी टोलचा मुद्दा उपस्थित केला होता. आज नाशिक दौरा आटोपून राज ठाकरे मुंबईच्या दिशेने जात असताना ठाणे टोलनाक्यावर हजारोंच्या संख्येने गाड्या रांगेत ट्रॅफिकमध्ये अडकल्या होत्या. त्यामुळे वाहनधारकांची होत असलेली गैरसोय बघून स्वत: राज ठाकरे टोलनाक्यावर गेले. यावेळी अडकलेल्या शेकडो वाहनांना रस्ता करुन दिला आणि ठाकरे शैलीत सज्जड दम दिला.

दरम्यान, नाशिक दौऱ्यात बोलताना राज ठाकरे म्हणाले की, टोलला माझा विरोध नाही. माझी मागणी आधीपासून इतकीच आहे.

# राज्य शासनाच्या धोरणविरोधात खेड राष्ट्रवादी काँग्रेसचे घंटानाद आंदोलन

**राजगुरूनगर :** राष्ट्रवादी काँग्रेस खेड तालुका (शरद पवार गट) यांच्यावतीने राजगुरुनगर (ता. खेड) येथे घंटानाद आंदोलन करण्यात आले.

राज्यातील महागाई, शेतमालाची नासाडी, युवा, विद्यार्थी, शेतकरी, बेरोजगार, महिला सुरक्षा, कामगार, अंगणवाडी सेविका असे सर्वच घटक त्रस्त असून या सर्व घटकांना वेगवेगळ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार रोहित पवार यांच्यावर ईडी कडून केल्या जाणाऱ्या कारवाई विरोधात त्याचप्रमाणे सर्वसामान्य लोकांच्या हिताचे मुद्दे घेऊन लढत असलेल्या या आंदोलनाच्या माध्यमातून लोकांच्या प्रश्नावरही जोरदार आवाज उठवून झोपेचे सोंग घेणाऱ्या सरकारला जागे करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सरकार कडून वारंवार केला जात असून त्याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्ष कार्यालय खेड तालुका ते तहसील कार्यालय पर्यंत रॅलीच्या माध्यमातून हे आंदोलन झाले. यावेळी खेड तालुकाध्यक्ष हिरामण सातकर, पक्षाचे नेते सुधीर मुंगसे, प्रदेश उपाध्यक्ष राजमाला बुट्टेपाटील, युवक अध्यक्ष विशाल झरेकर, युवक कार्याध्यक्ष ॲड. देविदास शिंदे पाटील, महिलाअध्यक्षा श्रद्धा सांडभोर, राजगुरुनगर शहराध्यक्ष रूपाली टाकळकर, चाकण शहर अध्यक्ष ॲड पूजा फडके, चाकण शहराध्यक्ष अशोक जाधव, युवकअध्यक्ष प्रशांत गोरे, जीवन मिंढे, सतीश पवळे, प्रवक्ते ॲड. बाळासाहेब लिंबोरे पाटील, प्राजक्ता थिगळे, पूर्व विभाग अध्यक्ष माऊली पिंगळे, हरिप्रसाद खळदकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

**आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांची जोरदार घोषणाबाजी**



**राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून आम्ही नेहमीच सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवला आहे. रोहित दादा पवार हेही आदरणीय शरद पवार साहेबांसोबत महाराष्ट्र धर्माच्या विचारांसाठी लढत आहेत. म्हणूनच त्यांच्यावर आकसाने कारवाई केली जात असून ती अन्यायकारक आहे. या कारवाईचा आम्ही तीव्र निषेध करतो. सरकारने कितीही त्रास दिला तरी आम्ही त्यांना शरण जाणार नाही, कुठल्याही परिस्थितीत घाबरून भाजपासोबत पळून जाणार नाही तर कठोर संघर्ष करू, लढू आणि जिंकू.**

**- हिरामण सातकर, तालुकाध्यक्ष रा. काँग्रेस खेड (शरद पवार गट)**

# नाट्यनिर्मिती संस्थांना अनुदान देण्याबाबत सांस्कृतिक कार्य विभाग प्रयत्नशील

**कोल्हापुर :** राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत नवीन नाट्यनिर्मिती करणाऱ्या संस्थांना अनुदान देण्याची योजना राबविण्यात येते. सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात दर्जा देण्यात आलेल्या नाट्य संस्थांच्या कागदपत्रांची छानणी करुन पात्र संस्थांचे अनुदान मिळण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यामध्ये मी, स्वरा आणि ते दोघे, हीच तर फॅमीलीची गंमत आहे, संज्या छाया, ३८ कृष्ण व्हीला, खरं खरं सांग, प्रेम करावं जपून या सहा नाटकांचे २३ लाख २५ हजार रुपये अनुदान मिळण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. हे अनुदान (२२०५ १६२३-३१) सहायक अनुदान या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीतून देण्यात येते. परंतु या लेखाशिर्षाखाली तरतुद शिल्लक नसल्याने हा निधी वितरीत करण्यासाठी वित्त विभागाची मान्यता मिळण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तसेच सन २०२३-२४ या वर्षात नाट्यनिर्मात्यांनी संचालनालयास सादर केलेल्या नाटकांच्या अनुदानाबाबत कागदपत्रांची छानणी सुरु असून पात्र नाट्यसंस्थांच्या नाटकांना अनुदान मंजूर करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ज्या नाटकांचे व्यावसायिक स्तरावर ५ प्रयोग झालेले असतील अशा नाट्यसंस्था व्यावसायिक नाट्य अनुदानासाठी पात्र असतात, तर ज्या प्रायोगिक नाटकांचे ३ प्रयोग झालेले असतील अशा संस्था प्रायोगिक नाट्य अनुदानासाठी पात्र असतात. संबंधित संस्थांनी नाट्य अनुदानासाठी अर्ज केल्यानंतर अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची छानणी करण्यात येते. छानणी झाल्यानंतर संबंधित संस्थेचे नाटक शासन नियुक्त सदस्यांमार्फत पुढील नाट्यप्रयोगाचे परीक्षण करण्यात येते. नाटकाचे परीक्षण झाल्यावर समिती सदस्यांनी दिलेल्या गुणवारीनुसार अ, ब, क दर्जाचे पत्र संचालनालयामार्फत संस्थेला देण्यात येते. या पत्राच्या दिनांकापासून पुढील एक वर्षाच्या आत संबंधित संस्थेला नियमानुसार नाट्यप्रयोग करणे बंधनकारक असते, अशी माहिती राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत देण्यात आली आहे.

# सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात १५ पदे रिक्त

## पक्षकारांना मनस्ताप; ॲड. सचिन तिरोडकर यांचा उपोषणाचा इशारा

**सातारा :** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सातारा येथे उपलब्ध मनुष्यबळाच्या तब्बल १५ पदे रिक्त आहेत. त्यामुळे न्यास नोंदणी प्रक्रियेत विलंब होत असून पक्षकारांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत आहे. विनाकारण भुर्दंड ही बसत आहे. येथील मनुष्यबळ ३१ मंजूर असताना प्रत्यक्षात १५ माणसे काम करत आहेत मनुष्यबळासाठी वारंवार पाठपुरावा करूनही कोणती हालचाल होत नसल्याच्या निषेधार्थ साताऱ्याचे ॲड. सचिन तिरोडकर यांनी न्यास नोंदणी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर ५ फेब्रुवारी रोजी लाक्षणिक उपोषणाचा इशारा दिला आहे.

या संदर्भात धर्मादाय आयुक्त कार्यालय पुणे व सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय सातारा या दोन्हीही कार्यालयाशी त्यांनी पत्रव्यवहार केला आहे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय अर्थात सामाजिक न्यास नोंदणी प्रक्रियेत केवळ मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने अत्यंत अडथळे येत आहेत. पक्षकारांना उशिरा तारखा मिळणे, तारखेसंदर्भात कागदपत्रे उपलब्ध नसणे, कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या यामुळे न्यास नोंदणीच्या कार्यात वारंवार अडथळे निर्माण होत आहेत.

येथे ३१ कर्मचारी आस्थापनेवर मंजूर असताना प्रत्यक्षात मात्र १५ कर्मचारी काम करत आहेत. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्यावर कामाचा प्रचंड ताण आहे.

पक्षकाराला योग्य न्याय न मिळणे, तांत्रिक त्रुटी अभावी पक्षकाराचा प्रस्ताव नाकारला जाणे किंवा पुढची तारीख मिळताना प्रचंड मनस्ताप होणे असे वारंवार प्रकार घडत आहेत. ॲड. सचिन तिरोडकर यांनी वेळोवेळी सातारा शहरातील प्रश्नांच्या संदर्भात आवाज उठवला आहे. अपुऱ्या मनुष्यबळाचा प्रश्न त्यांनी हातात घेतला असून यासंदर्भात येत्या ५ फेब्रुवारी रोजी राजवाडा येथील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

**पत्रव्यवहार करूनही दुर्लक्ष**

**या संदर्भात ॲड. सचिन तिरोडकर यांनी पुणे धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी पत्रव्यवहार केला होता. याला दोन महिने होऊनही अद्यापही कोणतीही हालचाल झालेली नाही. सामाजिक न्यास नोंदणी कार्यालयात कामासाठी येणाऱ्या वकिलांना याचा विनाकारण त्रास होत आहे.**

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रशासनाला निर्देश

**मुंबई :** आदिवासी भागातील पोषण आहार आणि आरोग्य सेवा सुधारण्यावर राज्य शासनाचे विविध विभाग समन्वयाने काम करीत असल्याने कुपोषणाचे प्रमाण कमी होताना दिसते, मात्र कृती दलाच्या शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी करून हे प्रमाण आणखीही कमी झाले पाहिजे असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याकामी सरपंचांचा सहभाग वाढविण्याची आणि आदिवासी भागात मोठ्या प्रमाणावर शिबिरे घेण्याचे निर्देश दिले.

आदिवासी क्षेत्रातील कुपोषण कमी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कृती दलाची बैठक आज सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांना कृती दलाचा पहिला अहवाल अध्यक्ष डॉ. दीपक सावंत यांनी सुपूर्द केला. यावेळी अपर मुख्य सचिव गृह सुजाता सौनिक, महिला व बालविकास सचिव अनुप कुमार यादव आणि कृती दलातील विविध विभागांचे सचिव, अधिकारी उपस्थित होते.

प्रारंभी विभागाने केलेल्या सादरीकरणात गेल्या तीन वर्षात आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण १.८२ टक्केवरून १.६२ टक्के इतके कमी झाल्याचे आणि उर्वरित राज्यातील कुपोषणाचे प्रमाण १.४३ टक्केवरून १.२२ टक्के इतके कमी झाल्याची माहिती देण्यात आली. आरोग्य सेविका, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा स्वयंसेविका व आयुष यांच्याजोडीने सरपंचांशी देखील समन्वय साधून आरोग्य आणि पोषण सेवा देण्यात येत आहेत अशी माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, ग्रामविकासात सरपंचाची मोठी भूमिका असते. सरपंचांचे देखील आपापल्या गाव, पाड्यामधील कुपोषण कमी करण्यात सहभाग असणे गरजेचे आहे. चावडी वाचन, शिबिरे या माध्यमातून कुपोषित महिला, बालके यांची माहिती वेळीच प्रशासनाला कळेल आणि त्यावर त्वरेने उपाययोजना करता येतील.

सध्या आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना माध्यान्ह भोजन देण्यात येते. ही योजना नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना देखील देण्यासंदर्भात तसेच अमृत आहार योजना शहरी भागात देखील देण्यासंदर्भात मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणण्याच्या सूचना देखील यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिल्या. कुपोषण ही गंभीर समस्या आहे. संबंधित सर्व विभागांनी एकत्रित समन्वयाने काम करून उचित पाऊले टाकली पाहिजे. कुपोषणात देशाच्या आकडेवारीत म हाराष्ट्र सर्वात शेवटी हवा असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, यामध्ये आदिवासी भागात एखादी महिला गरोदर राहिल्यापासून तिचे आरोग्य, आहार यावर सातत्याने आरोग्य, महिला व बालविकास यांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

# जन्मभूमी जन्मदाते आई-वडील व राष्ट्राप्रती कृतज्ञता बाळगा : वसंत हंकारे

## शिवस्मारक समितीच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन

**नारायणगाव :** कृतज्ञतेचा अर्थ जोपर्यंत आपल्याला समजणार नाही,तोपर्यंत आपण आनंदी जीवन जगू शकत नाही,आयुष्याला न्याय देऊ शकणार नाही. आपल्यासाठी इतरांनी काय केलं याचं स्मरण ठेवणं म्हणजेच कृतज्ञता. जन्मदाते आई-वडील,जन्मभूमी आणि राष्ट्र यांनी आपल्यावर केलेले उपकार विसरू नका,त्यांच्या प्रति कृतज्ञता बाळगा,असे मनोगत प्रसिद्ध प्रेरणादायी व्याख्याते वसंत हंकारे यांनी व्यक्त केले.

ग्रामोन्नती मंडळ नारायणगाव व शिवस्मारक समिती वारुळवाडी यांच्या वतीने गुरुवर्य रा.प. सबनीस विद्यामंदिरात आयोजित व्याख्यानाच्या कार्यक्रमात श्री.हंकारे बोलत होते. याप्रसंगी ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष अनिलतात्या मेहेर, गटशिक्षणाधिकारी अनिता शिंदे,आयुष मंत्रालयाचे अधिकारी साहेबराव मेंगडे, आंतरराष्ट्रीय खेळाडू हरिश्चंद्र थोरात, पोपट थोरात, मुख्याध्यापिका अनुराधा पुराणीक उपप्राचार्य हनुमंत काळे, उपमुख्याध्यापक सतीश तंवर , शिवस्मारक समितीचे धनेश वारुळे, अमोल कोळसे, सुरज दुधाळ, रामचंद्र भोई इत्यादी मान्यवरांसहीत विद्यार्थी, पालक,शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळांच्या भिंतीतून समाजाला फक्त डॉक्टर्स,इंजिनियर्स मिळत नाहीत तर चारित्र्यसंपन्न माणसं मिळतात. चारित्र्यसंपन्न माणसांची निर्मिती शाळेत होत असते. अहोरात्र राबणाऱ्या आपल्या बापाला विसरू नका. समाजात बापाला ताठ मानेने जगता येईल असं कर्तुत्व करा.अनाथ लेकरांना आई बापाचं महत्त्व विचारा, ज्यांच्या मागे आई-वडिलांचे छत्र उभे आहे ते नशीबवान आहेत. अहोरात्र आपली काळजी वाहणाऱ्या आणि आपल्यासाठी देह झिजवणाऱ्या आई-वडिलांना विसरू नका.तरुणांनी व्यसनांच्या आहारी जाऊ नका, सिगारेट तंबाखू मोबाईलची संगत करू नका. मुलींनी चारित्र्यसंपन्न राहा, कुसंगतीने आपलं आयुष्य बरबाद करू नका, तारुण्याच्या उंबरठ्यावर निर्णय घ्यायला चुकू नका, मुलींच्या चुकीच्या निर्णयाने बापाला शरमेने समाजात रोज मरावं लागतं,बापाची काळजी घ्या.असेही आवाहन श्री.वसंत हंकारे यांनी केले. आई-वडिलांची महती सांगत असताना हंकारे यांनी श्रोत्यांना अक्षरशः रडविले.



कार्यक्रमाला सुमारे चार हजार विद्यार्थी हजर होते. यावेळी ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष अनिल तात्या मेहेर यांचेही भाषण झाले. शिवस्मारक समितीच्या तरुणांनी एकत्र येऊन आयोजित केलेल्या या सुंदर उपक्रमाबद्दल मान्यवरांच्या हस्ते सर्व समिती सदस्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य हनुमंत काळे यांनी केले,पाहुण्यांचा परिचय उपमुख्याध्यापक सतीश तंवर यांनी सांगितला, सूत्रसंचालन प्रा.रमेश शेटे यांनी केले व आभार मेहबूब काझी यांनी मानले.

# विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी विद्यापीठांनी परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर करावेत : राज्यपाल रमेश बैस यांचे निर्देश

मुंबई : विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, नोकरीच्या संधीमध्ये अडचणी येऊ नयेत. यासाठी त्यांच्या भविष्याचा विचार करून सर्व विद्यापीठांनी वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करून परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर करावेत, असे निर्देश राज्यपाल रमेश बैस यांनी दिले. राजभवन येथे राज्यपाल बैस यांच्या अध्यक्षतेखाली कुलगुरू संयुक्त मंडळाची बैठक झाली. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, राज्यपाल यांचे सचिव श्वेता सिंघल, विशेष सचिव श्री. सक्सेना, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अजित बाविस्कर, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर,उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर अवर सचिव विकास कुलकर्णी यांच्यासह सर्व विद्यापीठाचे कुलगुरू, संबंधित अधिकारी उपस्थित होते. राज्यपाल बैस म्हणाले की, महाविद्यालयांनी एकत्रित येऊन क्लस्टर युनिव्हर्सिटी बनविण्याचा प्रयत्न करावा. तसेच विद्यापीठांनी ऑलिम्पिक विजेते खेळाडू तयार होण्यासाठी प्रयत्न करावेत. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शासन अग्रेसर आहे. प्रत्येक कुलगुरूंनी विद्यापीठांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी आणि केलेल्या कार्यवाहीबाबत सविस्तर अहवाल पाठवावा. कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आणि व्यवसायाभिमुख



शिक्षणावर अधिक भर देऊन रोजगार निर्मितीकडे लक्ष द्यावे. उच्च शिक्षणामध्ये महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिलेला आहे. एनआयआरएफ (छखठऋ) रैंकिंगमध्ये सुद्धा महाराष्ट्रातील विविध महाविद्यालये, विद्यापीठाचा समावेश वाढविण्यासाठी प्रयत्न करावे, अशी अपेक्षाही यावेळी राज्यपाल बैस यांनी व्यक्त केली. यावर्षी आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा ३५० वा वर्धापन दिन साजरा करत आहोत. यानिमित्त पारंपरिक खेळांना प्रोत्साहन द्यावे. महाविद्यालय हे समाज परिवर्तनाचे माध्यम आहे. प्रत्येक कुलगुरूंनी ग्रामीण भागातील दहा गावे दत्तक घेऊन त्यांचा सामाजिक विकास कसा होईल याकडे विशेष लक्ष द्यावे. महाविद्यालय परिसर हा नशामुक्त ठेवण्याचे आवाहनही राज्यपाल यांनी यावेळी केले. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील म्हणाले की, जर्मनीला विविध क्षेत्रात चार लाख कुशल, प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता आहे. याबाबत महाराष्ट्र शासन आणि जर्मन यांच्यात सामंजस्य करार होणार असून जर्मन कंपन्यांकडून मुलाखती घेऊन त्यांची निवड केली जाणार आहे. या विद्यार्थ्यांना जर्मन येथे जाण्याची व्यवस्था शासनाकडून केली जाणार आहे. तिथे किमान तीन महिन्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामध्ये काही विद्यार्थ्यांना अडचणी आल्या किंवा संबंधित कंपनीकडून निवड न झाल्यास त्यांना किमान तीन महिन्यांचा भत्ता देणे अनिवार्य असणार आहे. तसेच सीईटी परीक्षेचे वेळापत्रक नियोजित केल्याने यावर्षी एकाही प्रवेश परीक्षेच्या वेळेत बदल करावा लागला नाही, त्याच धर्तीवर विद्यापीठाने परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करून निकाल वेळेत जाहीर करावेत.

आठ लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागास वर्ग तसेच, आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील मुलींच्या सर्व अभ्यासक्रमाची १०० टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येणार आहे. येणाऱ्या शैक्षणिक वर्षात अधिकाधिक मुलींचे प्रवेश होतील, यासाठी विशेष अभियान राबवावे, अशा सूचनाही पाटील यांनी यावेळी केल्या. कौशल्य विकास मंत्री लोढा म्हणाले की, विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण मिळावे यासाठी सर्व महाविद्यालयात कौशल्य केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. प्रत्येक महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्य सचिव डॉ. करीर यांनी सांगितले की, राज्यातील सर्व खाजगी आणि शासकीय विद्यापीठात विविध प्रशिक्षण आहेत. विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी विविध भाषा आणि कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. यासाठी विद्यापीठांनी प्रयत्न करावेत. खाजगी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनाही कोणत्याही शासकीय, निमशासकीय कार्यालयात इंटर्नशिप करण्याची मुभा द्यावी. राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा निधी पहिल्या टप्प्यात वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे, तो वेळेत देण्यात यावा. विद्यापीठांना प्राप्त होणाऱ्या संलग्न शुल्कावरील जीएसटी माफ करण्यासाठी पुढच्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत मुद्दा मांडण्यात येईल. राष्ट्रीय शिक्षण धोरणात (एनईपी) विद्यार्थ्यांच्या क्षमता बांधणीसाठी योग्य धोरण राबवावे.

शिवाय विद्यापीठाच्या प्रत्येक शिक्षकांनी आठवड्यातून अर्धा तास तरी एनईपीबाबत ऑनलाईन माहिती घेण्यास प्राधान्य देण्याचे आवाहन मुख्य सचिव डॉ. करीर यांनी केले. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रस्तोगी यांनी सादरीकरण केले. मागील संयुक्त मंडळाच्या बैठकीमध्ये केलेल्या शिफारसी आणि सूचनांवरील प्रगती आणि अंमलबजावणी अहवाल, शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिट: अंमलबजावणीच्या स्थितीचा तपशील आणि कार्यअहवाल, नवीन क्रेडिट अभ्यासक्रमांतर्गत प्रत्येक विद्यापीठाने विकसित केलेल्या आयकेएस (खघड) कोर्सेसची सद्यस्थिती, नवीन शैक्षणिक धोरणानुसार मातृभाषेतून मराठी भाषेतील अनुवादित पुस्तकांचा आढावा घेतला. महा-स्वयंम, ऑनलाइन लर्निंग प्लॅटफॉर्म, नवीन क्रेडिट अभ्यासक्रम अंमलबजावणी आणि स्थिती व स्वायत्त महाविद्यालयासमोरील अडचणी, ई-समर्थ प्लॅटफॉर्म अंमलबजावणी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (छएझ) अंमलबजावणीसाठी अहवाल, उच्च तंत्र शिक्षण विभागाकडून राज्य शासनाच्या विविध विभागात इंटर्नशिप धोरण आणण्यासाठी मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव येणार आहे. त्याची अंमलबजावणी करणे, तसेच विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील संस्थात्मक इंटर्नशिप धोरण आणि विभागांसाठी इंटर्नशिप धोरण अंमलबजावणी करणे, राज्यातील विद्यापीठांसाठी एकत्रित समान शैक्षणिक वेळापत्रक ठेवणे, शैक्षणिक वर्षात फक्त एकदाच दीक्षांत समारंभ आयोजित करणे, 'युजीसी'च्या नियमांनुसार नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसाठी कॉलेज म्बेसेडरची नियुक्ती करणे, विद्यापीठस्तरावर सेवा हक्क कायद्याची अंमलबजावणी, विद्यार्थी तक्रार निवारण मंच स्थापन करणे, महाविद्यालयीन स्तरावर महिला निवारण मंचाची स्थापना, प्रत्येक विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे बळकटीकरण, छत्रपती शिवाजी महाराज चरित्रावरील अभ्यास शिबिरांचे आयोजन करणे अशा महत्वपूर्ण विषयांबाबत सविस्तर चर्चेद्वारे सादरीकरण करण्यात आले. विद्यापीठाने पदवी प्रमाणपत्र डिजीलॉकर सुविधेद्वारे विद्यार्थ्यांना तातडीने उपलब्ध करून द्यावे. त्यामुळे निकाल जाहीर झाल्यानंतर लगेच पदवी प्रमाणपत्र वापरता येईल. अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या. दरम्यान सुकाणू समितीचे सदस्य अनिल राव यांनी नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीबाबत सादरीकरण केले.

# बुद्धभूमी महाविहारासाठी जमीन आणि ५ कोटी चा निधी मिळवून देणार : रामदास आठवले



**भोपाळ :** बुद्धभूमी महाविहार मॉनेस्ट्री आणि गोल्डन बुद्ध प्रतिमा परिसराची जमीन बुद्धभूमी धम्मदूत संघाच्या नावावर करून देण्यासोबत या विहार परिसरात विपश्यना केंद्र ; भिक्खू निवास आदी सुविधांसह बुद्धभूमी चा विकास करण्यासाठी मध्य प्रदेश राज्य सरकार कडून रु.५ कोटींचा निधी मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री मोहन यादव यांची आपण भेट घेऊन पत्र देऊ असे आश्वासन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रिय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी दिले.ते भोपाळ येथे आयोजित ८ व्या आंतरराष्ट्रीय बौद्ध मेळाव्याच्या उदघाटन प्रसंगी उदघाटक म्हणून बोलत होते.

यावेळी बुद्धिस्ट मेळ्याचे आयोजक भदंत शाक्यपुत्र सागर थेरो; प्रमुख अतिथी थायलँड चे पुज्य भदंत फ्रा अचान विच्छिअन आणि भदंत गजानंद थेरो श्रीलंका; भन्ते थिक थुई थोन्ग (भूतान) भन्ते आनंद प्रिय थेरो(बांगलादेश) लामा सोनम तोबगाय (भूतान)

भन्ते हर्षबोधी बुद्धगया; भन्ते रुपेश दिल्ली; भन्ते अभय नायक नागपूर ; भन्ते विनशील कुशीनगर; भिक्षूणी श्रद्धा पुष्प ग्वालीयर ; भन्ते राहुल पुत्र जगभरातील अनेक बौद्ध भन्ते उपस्थित होते. यावेळी आमदार भगवानदास सबनानी; किसन सूर्यवंशी; रिपाइंचे मोहंमद एहसान ; दिलीप कडबे; आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

बँकॉक मध्ये जशी पर्वतावर कोरलेली बुद्धप्रतिमा आहे तशीच भोपाळ मध्ये सुद्धा उंच पर्वतावर कोरीवकाम करून बुद्ध प्रतिमा कोरली पाहिजे अशी सूचना ना.रामदास आठवले यांनी केली. जगाला युद्ध नाही तर बुद्ध विचारांची गरज आहे. बौद्ध धम्म शांतीच्या अहिंसेच्या तत्वांचे उगमस्थान आहे असे ना.रामदास आठवले म्हणाले.यावेळी मोठ्या संख्येने बौद्ध आंबेडकरी जनता उपस्थित होती.

## महत्त्वाचे

### वडूज येथे दि.४ रोजी कर्करोग मार्गदर्शन

**वडूज** : सर्वज्ञ सेवा संस्थेने जागतिक कर्करोग दिवस निमित्ताने रविवार दि. ४ फेब्रुवारी २०२४ रोजी दु. ४.०० वा वडूज येथील यशवंत मंगल कार्यालय मध्ये कर्करोग जनजागृती अभियान अंतर्गत डॉ. तेजल यांचे कर्करोग विषयावर मार्गदर्शन आयोजित केले आहे.

याच ठिकाणी महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### पुणे महानगरपालिका येथे नोकरीची सुवर्ण संधी

**सातारा** : सातारा जिल्ह्यातील माजी सैनिकांना कळविण्यात येते की, पुणे महानगरपालिका, पुणे येथे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (श्रेणी-३) या पदासाठी जागा भरावयाच्या आहेत. सदर भरतीची प्रक्रिया ऑनलाइन पध्दतीने असल्यामुळे पुणे महानगरपालिका, पुणे ची वेबसाईट www.pmc.gov.in वर दिनांक ५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत अर्ज करावेत. सबब माजी सैनिकांनी या सुवर्ण संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी , सातारा यांनी केले आहे.

### अशासकीय वसतीगृह अधीक्षक पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सातारा** : सातारा जिल्ह्यातील सर्व माजी सैनिकांना कळविण्यात येते कि, सैनिकी मुलांचे वसतिगृह, कराड या ठिकाणी अशासकीय वसतीगृह अधीक्षक या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अशासकीय कर्मचाऱ्याची नेमणूक करावयाची आहे. याकरिता सैन्य सेवेतून सुभेदार पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या माजी सैनिकांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,सातारा येथे सविस्तर अर्ज दिनांक ८ फेब्रुवारी २०२४ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, यांनी केले आहे.

# सिद्धनाथच्या निकालावरुन माढयाची लिटमस टेस्ट : खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर

**फलटण दि. २** : सिद्धनाथ नागरी सहकारी पतसंस्था संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणुकीत आ. जयकुमार गोरे यांना विरोध करण्यासाठी निवडणूक रिंगणात उतरलेल्या आ. श्रीमंत रामराजे यांना सभासदांनी दिलेला दणका पाहता माढा लोकसभा मतदार संघातील लोकमत कोणत्या दिशेला जाणार याची लिटमस टेस्ट झाली असून आ. श्रीमंत रामराजे यांना विरोधासाठी विरोध करण्याची भूमिका बदलावी लागेल असे मत खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी व्यक्त केले आहे.



या संस्थेतील गैरव्यवहार, कामगारांची नाराजी समोर आल्यानंतर आ. जयकुमार गोरे यांनी या संस्थेच्या निवडणुकित लक्ष घालुन सत्ता बदलासाठी प्रयत्न सुरु केले, त्याचवेळी केवळ आ. गोरे यांना विरोध करण्यासाठी आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी फलटण तालुक्यातील या संस्थेच्या सभासदांशी संपर्क प्रस्थापित करुन गाठी - भेटी, बैठका, हस्ते - परहस्ते निरोप देवून सत्ताधारी वाघोजीराव पोळ पॅनलला मतदान करण्याचे आवाहन तर केलेच पण शेवटच्या २ दिवसात आपल्या कार्यकर्त्यांना तालुक्यातील पतसंस्थेच्या सभासदांच्या गाठी भेटी घ्यायला लावून सत्ताधारी पॅनलला मतदान करण्यासाठी प्रयत्न केल्याचे निदर्शनास आणून देत लोकशाही मध्ये कोणी कोणाला मतदान करावे यावर कसलेही बंधन नसल्याने आ. श्रीमंत रामराजे यांच्या कृतीला आपला विरोध नाही, पण सभासदांनी त्यांचे मानले नाही हे लक्षात घेता उद्या माढा लोकसभा लढवायला निघालेल्या श्रीमंत संजीवराजे यांचे साठी तरी मतदार यांचे आवाहन स्वीकारणार का ? हा खरा सवाल या निकालाने निर्माण झाल्याचे खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी म्हंटले आहे.

सिद्धनाथच्या निवडणुकीत आ. श्रीमंत रामराजे यांच्यासह अनेकांनी पाठिंबा दिलेल्या सत्ताधारी पॅनलला सर्वच्या सर्व १३ जगावर सुमारे १७०० मतांच्या फरकाने पराभव स्विकारावा लागल्याचे किंबहुना फलटण तालुक्यातही सत्ताधाऱ्यांना पुरेसे मतदान झाले नसल्याचे खा. रणजितसिंह यांनी सांगितले.

# मावळात सोमवारपासून शासन आपल्या दारी अभियान



**शासनाच्या योजनांचा उपक्रमांचा लाभ सर्वसामान्यांना तात्काळ मिळावा हा या अभियानाचा उद्देश आहे.त्यासाठी कमीत कमी कागदपत्रे सादर करुन गतीने मंजुरी मिळण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे.या अनुषंगाने जनजागृती करण्यात आली आहे.गरजूंना विविध योजनांचा लाभ सहज मिळवून देणारा हा उपक्रम सर्वसामान्यांसाठी फायद्याचा ठरणार आहे.- आमदार सुनिल शेळके.**

**वडगाव मावळ** : तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी,महिला,जेष्ठ नागरिक यांचे प्रश्न त्वरित निकाली काढण्यासाठी आमदार सुनिल शेळके यांच्या संकल्पनेतून ५ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारीपर्यंत भेगडे लॉन्स येथे शासन आपल्या दारी हे अभियान राबविण्यात येत आहे.

शासन स्तरावर जनकल्याणाच्या अनेक योजना राबविण्यात येत असतात.सदर योजनांची प्रचार-प्रसिद्धी करून या योजनांसाठी जनजागृती केली जाते.मात्र नागरिकांना शासकीय कार्यालयामध्ये येणे,योजनांची सविस्तर माहिती घेणे, योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे जमा करणे अशा विविध प्रक्रियेतून जावे लागते.यासाठी नागरिकांना कागदपत्रे उपलब्ध करुन देणारी शासनाची कार्यालये ही वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना अनेक कार्यालयात जावे लागते. तसेच सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास त्या दूर करण्यासाठी वारंवार त्या कार्यालयांमध्ये जावे लागते.काही वेळा अनेक लोकांना शासनाच्या योजनांची माहिती नसते आणि माहिती असुनही योजनांचा लाभ गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचू शकत नाही.त्यामुळे या योजनांचा खरा उद्देश साध्य होत नाही.त्यामुळे या अभियानातून सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यावर भर असणार आहे.या अभियानात महसूल, कृषी, महावितरण,पाटबंधारे, वन विभाग पंचायत समिती, भूमी अभिलेख तसेच महा-ई-सेवा केंद्र तसेच विविध दस्तावेज उपलब्ध करुन देणारे या विभागांचे अधिकारी,कर्मचारी, ग्रामसेवक,तलाठी सहभागी होणार असल्याने नागरिकांच्या समस्यांचे निराकरण एकाच ठिकाणी होणार आहे. नागरिकांना अनेक योजनांची माहिती व लाभ मिळण्यासाठी शासकीय कार्यालयात जावे लागते. परंतु आता शासनाच्या योजना एकाच ठिकाणी नागरिकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे गरजू लाभार्थ्यांना याचा फायदा होईल.या अभियानात नागरिकांनी सहभाग नोंदवून लाभ घेण्याचे आवाहन आमदार सुनिल शेळके यांनी केले आहे.

# जागतिक रंगभूमी महोत्सव' व्हावा : राज्यपाल

**मुंबई** : भारताला रंगभूमीचा म ोठा इतिहास लाभला आहे. प्रत्येक राज्याची आपली स्वतंत्र रंगभूमी आहे. तमाशा, यक्षगान, नौटंकी, जत्रा, दशावतार यांसारख्या अनेक परंपरा देशात आहेत. या सर्व नाट्य परंपरा जगापुढे आणण्याची गरज आहे असे सांगताना न्यूयॉर्क मधील 'मेट गाला' फॅशन महोत्सवाप्रमाणे मुंबईत जागतिक रंगभूमीचा वार्षिक महोत्सव व्हावा, अशी अपेक्षा राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे व्यक्त केली.

राज्यपाल श्री. बैस यांच्या उपस्थितीत आज राष्ट्रीय नाट्य विद्यालयातर्फे आयोजित २५ व्या भारत रंग महोत्सवाचे उद्घाटन एनसीपीए, मुंबई येथे झाले, त्यावेळी ते बोलत होते.

उद्घाटन सत्राला राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे अध्यक्ष अभिनेते परेश रावल, 'भारंगम' महोत्सवाचे ब्रँड ॲम्बॅसेडर पंकज त्रिपाठी, अभिनेते रघुवीर यादव, राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे संचालक चित्तरंजन त्रिपाठी आदी उपस्थित होते.

रंगभूमी सर्वसमावेशक असावी. समाजाच्या तळागाळातील प्रत्येक व्यक्तीपर्यत रंगभूमीने पोहोचावे. लोकांचे दु:ख आपण दूर करू शकत नाही. परंतु काही तासांकरिता तरी लोकांना मनोरंजनाच्या माध्यमातून दु:ख विसरायला लावण्याची शक्ती कलाकारांकडे आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

आपण चाळीस वर्षे राजकीय मंचावर वावरत आहोत. परंतु, रंगकर्मींच्या मंचावर प्रथमच आलो असे सांगून राज्यातील व शहरातील नाट्यगृहे सुस्थितीत ठेवण्याची गरज असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

नाट्यगृहाचे भाडे परवडणारे ठेवल्यास लोकांना नाटकांची तिकिटे कमी किमतीत मिळू शकतील, असे त्यांनी सांगितले. रंगभूमी ही लोकचळवळ झाली पाहिजे व सर्व प्रादेशिक भाषा व बोलींमधून रंगभूमीला चालना दिली गेली पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

निवृत्त कलाकार व तंत्रज्ञ यांना दिली जाणारी पेन्शन वाढवली पाहिजे तसेच त्यांच्या वैद्यकीय उपचारांचा खर्च देखील केला पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले.

प्रत्येक राज्यात राष्ट्रीय नाट्य

# सातारा शहरातील १९ विकासकामांसाठी ६ कोटी ७८ लाख मंजूर

## आ. शिवेंद्रसिंहराजेंचा पाठपुरावा; अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेतून मिळाला निधी

**सातारा** : सातारा शहरातील असंख्य विकासकामे मार्गी लावणाऱ्या आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पाठपुराव्यातून नवीन १९ विकासकामे मार्गी लावण्यासाठी तब्बल ६ कोटी ७८ लाख ५८ जाहीर ८३६ रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. शासनाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेतून हा निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

शहरातील सदरबझार लक्ष्मी टेकडी, भानुदास पवार घर ते सुदाबाई कडाळे, सुंदर ओव्हाळ घर आणि रणदिवे दुकान ते बल्ला घर अखेर रस्ता कॉंक्रीट करणे व गटर करणेसाठी ३९३६५१२ रुपये, चारभिंती मुख्य रस्ता लगत झोपडपट्टी जवळ रिटेनिंग वॉल बांधणे १३००४९३ रुपये, गोडोली बागडी वाडा येथे रस्ता काँक्रीट करणे ७१७२५३ रुपये, गोडोली मस्के कॉलनी येथे रस्ता कॉंक्रीट करणे २९७२२०५ रुपये, सी.स.न. १५२ भीमाबाई आंबेडकर चौक, सदरबझार सातारा येथे उद्यानामध्ये फूड स्टॉल व इतर कामे विकसित करणे ८७२१४८१ रुपये, मिलिंद हौसिंग सोसायटी उद्यान येथील उर्वरित विकासकामे करणे २९०६९२६ रुपये, गुरुवार पेठ दलित वस्ती



येथे गटर रस्ते व रिटेनिंग वॉल करणे ४५२९७०७ रुपये, प्रभाग क्र. १९ सि.स. नं. २७८ रामाचा गोट ते कुरेशी घर ते खारी विहीर अखेर कॅनॉल टाईप गटर करणे ८२८६६१० रुपये, मंगळवार पेठ ४०१ झोपडपट्टी नितीन लोहार घर ते राकेश कांबळे ते तानाजी घाडगे घर अखेर रस्ता कॉंक्रीट करणे ७७८२७१ रुपये निधी मंजूर झाला आहे.

मंगळवार पेठ सि.स. नं. ४०८ सयाजी घर ते रविंद्र माने घर अखेर रस्ता कॉंक्रीट करणे ६७४६९३ रुपये, नालंदा नगर येथील उर्वरित कामे करणे ७४७७९३२ रुपये, सि.स. नं. २७८ रामचा गोट येथे सार्वजनिक शौचालय बांधणे ८१८७५३ रुपये, मंगळवार पेठ मातोश्री नगर येथे सार्वजनिक शौचालय बंधने ७९९३१९, ४४६ आशीर्वाद नगर येथे सार्वजनिक शौचालय बांधणे ७९९३१९ रुपये, मंगळवार पेठे संत कबीर सोसायटी येथे सार्वजनिक शौचालय बांधणे ७९९३१९ रुपये, पंतांचा गोट येथील रस्ते गटर व पाईप ड्रेन करणे ४२३७२८९ रुपये, प्रभाग क्र. १९ वेताळ बाबा मठ येथील खुल्या जागेत ५ लक्ष लिटर क्षमतेची टाकी बांधणे ११११९८५५४ रुपये, मल्हार पेठे अंतर्गत रस्ता कॉंक्रीट करणे ३७२८२७४ रुपये, प्रभाग क्र. १९ किरण ढोणे ते बागवान घर कॅनॉल टाईप गटर करणे यासाठी ३८९५९२६ रुपये निधी उपलब्ध झाला आहे. तातडीने निविदा प्रक्रिया व इतर शासकीय सोपस्कार पूर्ण करून कामे सुरु करा. कामे दर्जेदार करून वेळेत पूर्ण करा, अशा सूचना आ. शिवेंद्रसिंहराजे यांनी पालिकेच्या अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

## ऐतिहासिक व सांस्कृतिक दर्शन महासंस्कृती महोत्सव २०२४

**कोल्हापूर** : सांस्कृतिक कार्य विभाग आणि कोल्हापूर जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयातून महासंस्कृती महोत्सव २०२४ कोल्हापुरात ३१ जानेवारी ते ५ फेब्रुवारी या कालावधीत ऐतिहासिक शाहू मिल येथे आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी शाहीर खडके पार्टी लोककला मंडळ सावर्डे, तालुका शाहूवाडी यांच्या मार्फत लोककलांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. यामध्ये गण, गवळण, शिव-शाहूंच्या विचारावर पोवाडे सादर करण्यात आले. यानंतर महाराष्ट्राच्या पाऊलखुणा हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

# जबरी चोरीच्या गुन्ह्यातील दोन आरोपी जेरबंद

**कुडाळ** : पाटणेचीमाची ता. जावली येथील वयोवृद्ध महिला मेढा येथून पाटणेमाची येथे मेढा ते कुसुंबी जाणारे रोडने पायी चालत निघाली असताना.तीला लिफ्ट देऊन गाडीवर गर्दी होतेय हा बहाणा करीत तिला गाडीवरून उतरवून तिच्या गळ्यातील गळ्यातील सोन्याचे मनी असलेली माळ हिसकावून जबरीने चोरून दोघेही पळून गेले.दरम्यान स्थानिक युवकांच्या मदतीने मेढा पोलिसांनी अवघ्या एका तासात या दोन्ही आरोपींना जेरबंद केले.



याबाबत सविस्तर माहिती अशी की सदर महिला ही पाटनेमाची या तिच्या गावी निघाली असताना.तिला एकटीच चालली असल्याचे पाहत दोन अनोळखी इसमांनी मोटार सायकल वर येवून तिचेजवळ थांबून आम्हीही पाटणेमाची येथील राहणारे असून तुम्हाला गाडीवरून सोडतो, म्हणून सदर महिलेस गाडीवर बसवून घेवून गेले. काही अंतर गेलेवर मौजे पिंपरी ता. जावली गावचे हद्दीत रोडला कोणीही नाही हे पाहून तेथे गाडी थांबवून सदर महिलेस गाडीवर गर्दी होत आहे तुम्ही येथेच उतरा असे सांगून तिला मोटार सायकल वरून खाली उतरविले व मोटारसायकल वर पाठीमागे बसलेल्या इसमाने सदर महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मनी असलेली माळ हिसकावून जबरीने चोरून ते दोन्ही इसम कुसुंबी बाजूकडे भरधाव वेगात निघून गेले होते.

सदर घटनेच्या संदर्भाने मिळाले माहीतीवरून व आरोपीचे वर्णनावरून संतोष तासगांवकर सहाय्यक पोलीस निरीक्षक मेढ़ा पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणेचे खास पोलीस पथक तयार करून आरोपीचा शोध घेणेस सुरवात केली. मौजे मेढा येथील ग्रामस्थ गणेश जवळ यांच्याकडून आरोपी हे कुसुंबी बाजूकडे गेले असल्याची माहीती मिळाल्याने पोलीस ठाणे हद्दीत नाकाबंदी लावून तपास पथक कुसुंबी बाजुकडे रवाना केले. व साबळेवाडी फाटा येथे पोलीस पथक व स्थानिक ग्रामस्थ विकास जाधव व गावातील इतर ग्रामस्थ यांचे मदतीने नाकाबंदी चालू असताना. अनोळखी संशयीत दोन इसम हिरो होन्डा मोटार सायकल वरून वेळे गावाकडून आले. त्यांचे वर्णन सदर वयस्कर महिलेने सांगीतलेल्या वर्णनाशी मिळते जुळते असल्याने सदर दोन्ही इसमांना लागेच ताब्यात घेवून पोलीस ठाणे येथे आणुन त्यांचेकडे गुन्हह्याचे अनुशंगाने सखरोल विचारपुस केली असता सदर दोन इसमांनी गुन्ह्याची कबूली दिल्याने. त्यांना ताब्यात घेवन त्यांचेकडून जबरीने चोरी करून सोन्याचे दागिने व त्यांनी गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल जप्त करणेत आली असून मेढ़ा पोलीसांनी स्थानिक नागरीक यांचे सहकार्याने गुन्हा उघडकीस अणण्यात आला आहे.

# पथकाने सलग तिसऱ्यांदा मिळवलेले यश गौरवास्पद : मुख्यमंत्री

**मुंबई** : महाराष्ट्र नॅशनल कॅडेट कॉर्प्स (एनसीसी) संचालनालयाने प्रतिष्ठेचा 'प्रधानमंत्री बॅनर' पटकावून देशातील सर्वोत्तम संचालनालयाचा बहुमान सलग तिसऱ्यांदा पटकविला आहे. महाराष्ट्राच्या एनसीसी पथकाने मिळवलेले हे गौरवास्पद यश त्यांच्या मेहनतीचे आणि सांघिक कामगिरीचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

सह्याद्री अतिथीगृहात प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातून दिल्ली येथे संचलनात सहभागी झालेल्या एनसीसी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र छात्र सेना संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगेंद्र सिंग, ब्रिगेडिअर विक्रांत कुलकर्णी यांच्यासह राष्ट्रीय छात्रसेनेचे वरिष्ठ अधिकारी, प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी तसेच विविध पारितोषिक पटकावणारे छात्रसैनिक आदी उपस्थित होते. या सर्वांना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते प्रधानमंत्री बॅनर सुपूर्द करण्यात आला, तसेच विविध पारितोषिक पटकावणाऱ्या छात्रसैनिकांचा सत्कार करण्यात आला.

मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले, महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांच्या शुरता, वीरतेचा वारसा आपल्याला लाभला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा जनकल्याणाच्या विचारांचा वारसा घेऊन आम्ही काम करत आहोत. हे तुमचे, लोकांचे सरकार आहे. अशा कामगिरीमुळे विविध क्षेत्रात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. तुमच्या यशामुळे राज्याचा गौरव वाढला असून भविष्यातही हा बहुमान कायम ठेवण्यासाठी सर्वांनी मेहनत करावी. महाराष्ट्र शासन सर्व सहकार्यासाठी संचालनालयाच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी एनसीसी पथकास मार्गदर्शन करणाऱ्या अधिकारी, शिक्षकांचे आणि एनसीसी छात्रसैनिकांचे अभिनंदन केले.

## देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा : वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील

**मुंबई** : वस्त्रोद्योग व्यवसायाम ध्ये गुंतवणूक करण्याची मोठी संधी असून उद्योजकांना सर्व सोयीसुविधा शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येतील. उद्योजकांनी वस्त्रोद्योगोला प्रोत्साहन देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहन वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

उद्धाटन वस्त्रोद्योग मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी वस्त्रोद्योग विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, उपसचिव श्रीकृष्ण पवार, अमर अख्तर, शरद जैनपुरिया, सिमॉन-ली, हिमानी गुलाटी उपस्थित होते.

मंत्री श्री.पाटील म्हणाले की, वस्त्रोद्योगासाठी नवीन धोरण राज्यात आणले आहे. या धोरणाच्या माध्यमातून २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित आणि ५ लाखांपर्यत रोजगार निर्मितीचे लक्ष्य आहे. राज्यात वस्त्रोद्योग क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.वस्त्रोद्योग व्यवसायाची एक दर्जेदार श्रृंखला निर्माण होण्यासाठी शेतकरी, वस्त्रोद्योग घटक आणि रोजगार निर्मितीवर अधिक भर देण्यात येणार आहे. देशातील दोन प्रमुख व्यावसायिक केंद्रांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनामुळे देशभरातील कापड क्लस्टर्सच्या व्यावसायिक मागण्या पूर्ण होतील. वस्त्रोद्योग हा भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठ्या क्षेत्रांपैकी एक आहे.

# गाव चलो अभियानाच्या माध्यमातून भाजपा प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणार

## भाजपा प्रदेशाध्यक्ष श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

**मुंबई** : भारतीय जनता पार्टीतर्फे ४ ते ११ फेब्रुवारी या काळात व्यापक जनसंपर्कासाठी 'गाव चलो अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील सर्व मंत्री, केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्यासह पक्षाचे सर्व केंद्रीय मंत्री, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, प्रदेश पदाधिकारी, खासदार, आमदार त्यांना दिलेल्या गावात एक दिवस मुक्कामी राहणार आहेत, अशी घोषणा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी केली. भाजपा मुंबई कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत श्री. बावनकुळे बोलत होते. आ. योगेश सागर, आ. पराग आळवणी, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी यावेळी उपस्थित होते. आपण स्वतः अमरावती जिल्ह्यातील साऊर येथे एक दिवस राहणार आहोत, असेही श्री. बावनकुळे यांनी नमूद केले.




श्री. बावनकुळे म्हणाले की, आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उत्तम संघटनात्मक बांधणी करत, विकासाचा अजेंडा डोळ्यासमोर ठेवून भाजपा कार्य करत आहे. तळागाळातील प्रत्येक मतदारापर्यंत मोदी सरकारचे मागच्या १० वर्षातील प्रभावी कार्य, मागच्या जाहीरनाम्यातील आश्वासनांची केलेली पूर्ती, विकसित भारताचा संकल्प सांगणा-या यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पातील ठळक तरतुदी ही सर्व माहिती पोहोचण्याच्या उद्देशाने 'गाव चलो अभियान' हाती घेण्यात आले आहे. मोदीजीं ची गॅरंटी काय आहे हे प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी मागच्या १० वर्षातील मोदी सरकारच्या योजना व उल्लेखनीय कामगिरीची माहिती देणारी पत्रके वितरित करण्यात ग़ेणार आहेत.

श्री. बावनकुळे यांनी सांगितले की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर जिल्ह्यातील पारडसिंगा येथे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा ( ता. कळमेश्वर ) मुंबई अध्यक्ष आ. आशीष शेलार हे गुरामवाडी (ता. मालवण), रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे हे जालना जिल्ह्यातील वालसावंगी येथे एक दिवस मुक्कामास जाणार आहेत. पीयूष गोयल, डॉ. भारती पवार, डॉ. भागवत कराड, कपिल पाटील हे केंद्रीय मंत्रीही या अभियानात सहभागी होणार आहेत. शहरी भागात वॉर्ड निहाय हे अभियान राबविले जाईल. केंद्रीय सरचिटणीस विनोद तावडे हे विलेपार्ले येथे या अभियानात सहभागी होणार आहेत.

या अंतर्गत ५० हजार युनिट्समध्ये भाजपा चे ५० हजार प्रवासी नेते, प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणार आहेत. पक्षाचे आजी व माजी खासदार, आमदार, जि.प सदस्य यांच्यासोबतच सर्व नेतेमंडळी राज्यभरातील प्रत्येक युनिटमध्ये प्रवास करतील व त्यांना ३२ हजार सुपर वॉरियर्सचे देखील सहकार्य मिळेल अशी माहिती श्री. बावनकुळे यांनी दिली. प्रत्येक युनिटमध्ये भाजपा चा प्रवासी नेता एक दिवस मुक्काम करून, बुथ प्रमुखांच्या बैठका, नागरिकांच्या भेटी, नवमतदारांशी चर्चा अशी आखून दिलेली १८ संघटनात्मक कामे करेल असेही श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

५० हजार युनिट्समध्ये गाव चलो अभियानांतर्गत एका लोकसभेत साधारण ३.५ लाख घरांना भेटी देण्याचे उद्दिष्ट असल्याचे श्री. बावनकुळे यांनी नमूद केले. प्रत्येक वर्गापर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने युवकांसाठी 'नमो चषक' तसेच महिलांसाठी 'शक्ति वंदन कार्यक्रम' देखील राबवण्यात येत आहे. लवकरच पंतप्रधान मोदी हे शक्तिवंदन कार्यक्रमाद्वारे महिला बचत गट प्रतिनिधींशी संवाद साधणार असल्याची माहिती श्री. बावनकुळे यांनी दिली.

# पुणे ग्रामीणच्या पोलीस अधीक्षकपदी पंकज देशमुख



**वडगाव मावळ** : पुणे जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक म्हणून पंकज देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.पोलिस अधीक्षक अंकित गोयल याची पदोन्नतीने गडचिरोलीचे परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे अप्पर पोलीस अधीक्षक मितेश घटटे व आनंद भोईटे या दोघांचेही पोलीस उपआयुक्त बृहन्मुंबई येथे बदली करण्यात आली आहे आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने वरीष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचे बदलीचे आदेश पारित केले आहे.

# विमानतळ विस्तारीकरणासाठी ४८ हेक्टर भूसंपादन

## पालकमंत्री शंभूराज देसाई यांची माहिती; पैसे न स्वीकारणाऱ्या शेतकऱ्यांचा मोबदला कोर्टात भरणार



**सातारा :** कराड विमानतळ आणि विस्तारीकरण आणि विकसन प्रक्रियेला राज्य शासनाने अंतिम मंजुरी दिली असून नाईट लँडिंगच्या दृष्टीने कामे प्रगतीपथावर आहेत. याकरिता ४८ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप भूसंपादन प्रक्रियेचा मोबदला स्वीकारलेला नाही, त्या शेतकऱ्यांचे पैसे कोर्टात भरून जमिनीचा रितसर ताबा पुढील प्रक्रियेसाठी घेणार असल्याचा अल्टिमेटम पालकमंत्री तथा राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी दिला. पवनचक्क्यांचे जिओ टॅगिंग, मोरणा गुरेघर, वांग मराठवाडी प्रकल्पांचा आढावा यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात पार पडली

या बैठकीत विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आल्याचे मंत्री देसाई यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, पोलीस अधीक्षक समीर शेख, उपवनसंरक्षक आदिती भारद्वाज, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, जलसंपदा विभागाचे अध्यक्ष अभियंता जयंत शिंदे इत्यादी उपस्थित होते.

### अडथळे ठरणारी अतिक्रमणे काढणार

**या संदर्भात जर विलंब झाल्यास संबंधित खातेधारकांचे पैसे कोर्टात भरून जमिनीचा ताबा तत्काळ घेतला जाणार असल्याचे मंत्री देसाई यांनी जाहीर केले. एअरपोर्ट अ‍ॅथोरिटी ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार व नियमानुसार जी कामे व टॉवर्स विमानतळ प्राधिकरण क्षेत्रात अडथळे ठरतील, ती अतिक्रमणे काढण्याचे निर्देश या बैठकीत पालकमंत्र्यांनी दिले.**

पत्रकारांशी संवाद साधताना देसाई म्हणाले, कराड विमानतळाच्या विकस आणि विस्तारीकरणाच्या दृष्टीने विमानतळाची १२८० मीटरची धावपट्टी १७०० मीटर करण्यात येणार आहे. या संदर्भातील आवश्यक प्रस्ताव तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी यापूर्वीच तयार केले होत. विस्तारीकरणासाठी ४८ हेक्टरचे भूसंपादन झाले आहे. जवळपास ६२ टक्के खातेदारांना भूसंपादनाचा निधी वितरित केला आहे. उर्वरित खातेदारांना नोटीस देऊन भूसंपादनाची भरपाई स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले.

### प्रत्येक पवनचक्कीला जिओ टॅगिंग

**पाटण तालुक्यात १०६२ पवनचक्क्यांची नोंद असून उभारण्यात येणाऱ्या प्रत्येक पवनचक्कीला जिओ टॅगिंग करण्याचा निर्णय मंत्री देसाई यांनी जाहीर केला. पवनचक्की निर्माण करत असलेली वीज आणि त्यासाठी पडणारे मीटर रिडींग याची फेर पडताळणी केली जात आहे. ते काम सातारा जिल्हा परिषदेच्या यंत्रणेने करावयाचे आहे. ग्रामपंचायत हद्दीत उभारण्यात येणाऱ्या पवनचक्क्यांना क्रमांक देण्यात यावेत, पवनचक्की कंपन्यांनी शासनाचा कर चुकवू नये, उभारण्यात आलेल्या पवन चक्क्यांमधून किती विद्युत निर्मिती होते, याची काटेकोर तपासणी करण्यात यावी, या दृष्टिकोनातून जिओ टॅगिंगची रचना करण्यात आल्याचे मंत्री देसाई यांनी सांगितले.**

कर थकबाकी असणाऱ्या कंपन्यांना अंतिम नोटीस देऊनही विहित मदत करणाऱ्या कंपन्यांवर कडक कारवाई करावी आणि शंभर टक्के वसुली करावी, असे निर्देश पालकमंत्री देसाई यांनी दिले.

मोरणा गुरेघर, वांग मराठवाडी प्रकल्पाचा त्यांनी आढावा घेतला. या प्रकल्पांतर्गत उजवा व डावा कालवा हा बंदिस्त पाईपलाईन करावयाचा आहे. या कामाच्या मंजुरीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठकीतून विशेष बाब म्हणून या कामाला मंजुरी घेण्यात येईल. जिंती व निगडे गावातील २६१ कुटुंबाचे पुनर्वस्थाचा प्रश्न प्रलंबित आहे याबाबत पुनर्वसन मंत्र्यासोबत बैठकीचे आयोजन करून पुनर्वस्नानासाठी विशेष बाब म्हणून मंजुरी घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

---

# स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील ६५ प्राथमिक आरोग्य केंद्र अद्ययावत करणार : जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी

**सातारा :** स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील ६५ प्राथमिक आरोग्य केंद्र अद्ययावत करण्यात येतील, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले.

आरोग्य धनसंपदा हे सुंदर सुत्र आपल्या भारतीय संस्कृतीने आपणांस सांगितले आहे. उत्तम आरोग्य हिच खरी संपत्ती तथा सर्व सुखाचे आगर होय, याच सद्विचारास बांधिल राहून दर्जेदार गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्याचा निश्चय जिल्हा प्रशासन आणि सातारा जिल्हा परिषदे मार्फत केला आहे. समाजातील सर्व घटकांना आरोग्य संपन्न जीवन जगण्याचा अधिकारी आहे. तो फलद्रुप होण्यासाठी त्यांना गाव व प्राथमिक आरोग्य केंद्र पातळीवर गुणात्मक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे हा मुख्य उद्देश आहे. सातारा जिल्हा हा राज्यात आरोग्य सेवेचा दर्जा उंचावणारा व पथदर्शी कार्यक्रम राबविणारा जिल्हा आहे. भविष्यात सुध्दा अशाच प्रकारे जिल्यातील ग्रामीण व शहरी भागातील जनतेला उच्च प्रकारच्या आरोग्य सेवा पुरविण्याचा मानस ठेवूनच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

त्याच अनुषगांने महाराष्ट्र शासन, सातारा जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषद सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा जिल्हयातील एकूण ६५ प्राथमिक आरोग्य केंद्रांचे रुपांतर स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये करण्यात येणार आहे. सदर उपक्रमाचा शुभारंभ .

**सातारा जिल्हयातील ग्रामीण भागातील लाभार्थीना उच्चप्रतिची आरोग्य सेवा देणे करीता जिल्हयातील ६५ प्राथमिक आरोग्य केंद्रांत सोलर सिस्टीम, रेन वॉटर हारवेस्टींग, स्वागत कमान, अद्ययावत यंत्रसामुग्री, संगणकीरण, आयुष गार्डन, सुसज्ज फर्निचरयुक्त कक्ष, अद्ययावत वॉर्ड, इ. सोईसुविधा उपलब्ध करणेत येणार असून त्याव्दारे जिल्हयातील रुग्णांना देण्यात येणा-या सेवांचा दर्जा उंचावणार व शासकीय सेवांबाबत ग्रामीण लाभार्थींमध्ये विश्वास निर्माण करणार.**
**- श्री जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी, सातारा**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आलेला होता. तद्रंतर त्याअनुषंगाने जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी आवश्यकतेनुसार बदल करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यासाठी जिल्ह्यातील अधिकारी यांची आढावा बैठक जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

सातारा जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र (स्मार्ट पी एच सी) उपक्रमांतर्गत खालील प्रमाणे बदल करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

अद्यावत वैद्यकिय साहित्य, प्रा आ केंद्रामधील अंतर बाहय विभाग, प्रसुतीगृह व शस्त्रक्रियागृह हे प्रमुख विभाग असून हे सर्व विभाग अद्ययावत तांत्रिक संसाधनांनी सुसज्य ठेवण्यासाठी अद्ययावत साधन सामुग्री खरेदीबाबत सूचना देण्यात आल्या.

आधुनिक तंत्रज्ञान वापर रुग्णांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे, लोकांना स्मार्ट हेल्थ कार्ड उपलब्ध करुन देणे, रुग्णांना त्यांच्या तपासणीचे अहवाल मोबाईलवर उपलब्ध करुन देणे, तसेच रुग्ण पुढील उपचारा करीता इतर शासकीय संस्थेकडे संदर्भीत केल्यास रुग्णांची या पुर्वीचा उपचार इतिहास त्या संस्थेकडे ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध होणे करीता अद्ययावत संगणकीय प्रणाली विकसित करुन घेण्यात यावी.

मनुष्यबळ व प्रशिक्षण सर्वसमावेशक आरोग्य सेवा देण्यासाठी आरोग्य सेवा देणारे अधिकारी कर्मचारी यांचे विविध प्रकारचे तांत्रिक प्रशिक्षण गरजेनुसार मार्गदर्शक सुचनांनुसार पूर्ण करण्यासाठी आवश्यक बाबींची माहिती प्राप्त होणेसाठी जिल्ह्यातील सर्व स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्रांची णपळलशषष मार्फत पाहणी करणेत आलेली असून त्यांचे अहवालानुसार जिल्हा प्रशिक्षण केंद्रांमार्फत आवश्यकतेनुसार अधिकारी व कर्मचारी यांचे तांत्रिक व प्रशासकीय कौशल्यावर आधारित प्रशिक्षण आयोजित करणेत येतील

प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम व परिसर सुशोभिकरण प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये बाह्य परिसरामध्ये प्रामुख्याने संरक्षक भिंत, अंतर्गत रस्ते, हिरकणी कक्ष, प्रसाधन गृह, निवासस्थाने इ. बाबींचा तर अंतर्गत भागामध्ये प्रसुतीगृह, प्रयोगशाळा, औषध भांडार, शस्त्रक्रियागृह व संगणक कक्ष इ. बाबी प्रामुख्याने अद्ययावत करणेबाबत सूचना देणेत आल्या. उपरोक्त सर्व बाबी सुस्थीतीत असणे व आवश्यक्तेनुसार दुरुस्ती करणे, सुशोभिकरण करणे, स्वच्छता, इ. बाबींवर प्रामुख्याने विशेष लक्ष देणेबाबत सूचना देणेत आल्या. प्राआकेंद्रांची स्वतंत्र स्वागत कमान करणे व प्राआकेंद्र दर्शनी भागात आयुष गार्डन साठी उड्ठ मधून निधी उपलब्ध करुन घेणेसाठी प्रयत्न करावेत.

---


### महाबळेश्वर गिरिस्थान प्रशालेत माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळावा आयोजन

**महाबळेश्वर :** महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद संचलित गिरिस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात माजी विद्यार्थी महामेळावाचे आयोजन शनिवारी ०३ फेब्रुवारी रोजी सकाळी ०९ वाजता शाळेच्या प्रांगणामध्ये करण्यात आले आहे या स्नेहमेळाव्यास हजारो माजी विद्यार्थी सहभागी होणार आहेत या माजी विद्यार्त्यांची नोंदणी देखील झाली आहे सकाळी ०९ वाजता छ शिवाजी महाराज चौकामधून आजी माजी विद्यार्थ्यांसह शिक्षक आदींच्या उपस्थितीत दिंडी मुख्य बाजारपेठ मार्गे प्रशालेपर्यंत निघणार आहे या स्नेहमेळाव्यामध्ये दिवसभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार असून माजी शिक्षकवृंदांचे स्वागत व सन्मान करण्यात येणार आहेत पालिका प्रशासक योगेश पाटील हे या कार्यक्रमाचे अध्यक्ष असून शिक्षणाधिकारी आनंद पळसे हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत ०५ जून १९६७ साली पालकेच्या माध्यमातून स्थापन झालेल्या प्रशेलेमध्ये प्रथमच इतक्या मोठ्याप्रमाणावर माजी विद्यार्थ्यांच्या अथक प्रयत्नातून व पालिका प्रशासक योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य स्नेहमेळावा साजरा होत असून प्रशालेच्या माजी विद्यार्थांनी सहभागी होण्याचे आवाहन प्रशालेचे मुख्याध्यापक के बी ढाणक यांनी केले आहे.

---

# लॉजिस्टिक हबच्या दिशेने नाशिकची पावले

### महिंद्रा लॉजिस्टिकची वेअर हाऊसमध्ये जवळपास पाचशे कोटींची गुंतवणूक



**नाशिक:** तीन वर्षांपूर्वीनाशिकदौऱ्यावर आलेले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नाशिकमध्ये लॉजिस्टिक हब बनण्याची पूर्ण क्षमता असल्याचे जाहीर करीत त्यासाठी स्थानिक नेते, कंपन्यांनी पुढाकार घेतल्यास आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले होते. त्या दिशेने नाशिकची पावले पडण्यास प्रारंभ झाल्याचे दिसू लागले आहे.

महिंद्रा लॉजिस्टिकने नाशिकमध्ये वेअर हाउसमध्ये जवळपास पाचशे कोटींची गुंतवणूक केली असून पुढच्या काळात लॉजिस्टिक हब बनण्याच्या दिशेने सुरुवात झाली आहे.जिल्ह्यातून आधीच अस्तित्वात असलेल्या मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गाबरोबरच आता समृद्धी महामार्ग, प्रस्तावित असलेला सुरत-चेन्नई एक्सप्रेस वे आदींमुळे देशातील प्रमुख शहरांशी नाशिक थेट जोडले जाणार आहे.

प्रजासत्ताक दिनानिमित्त नुकतेच ५० एकर जागेवर नवीन वेअर हाउसचे भूमिपूजन करण्यात आले. या ठिकाणी आधीच ८३ हजार स्केअर फूट क्षमता असलेले वेअर हाउस 'ग्रीन बिल्डिंग' म्हणूनही प्रमाणित झाले आहे. त्यानंतर शेकडो कोटींची गुंतवणूक करीत तिसऱ्या सर्वांत मोठ्या वेअर हाउस प्रकल्पाचे वासाळी शिवारात प्रजासत्ताकदिनी भूमिपूजन करण्यात आले. लॉजिस्टिक्स क्षेत्रात भिवंडीनंतर नाशिकचे भौगोलिक स्थान अनेक अर्थाने महत्त्वपूर्ण आहे. समृद्धी महामार्ग तसेच सुरत-चेन्नई हायवेमुळे नाशिकची कनेक्टिव्हिटी गुजरात, मध्य प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू अशा अनेक राज्यांसोबत होणार आहे.

त्यामुळे माल वाहतुकीसाठी नाशिक सोईस्कर ठरत आहे. त्याच अनुषंगाने महिंद्रा लॉजिस्टिक्सने नाशिकवर लक्ष केंद्रित केले आहे. या ठिकाणी ५० एकर जागेत शेकडो कोटींची गुंतवणूक करीत सुमारे तीन लाख स्केअर फुटांचा वेअर हाउस प्रकल्प साकारणार आहे. त्यातून किमान ५०० पेक्षा जास्त अधिक नागरिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे

---

# पैसा, दहशत व प्रशासनाच्या मदतीने राजकारण ताब्यात घेणाऱ्या प्रवृत्तींना विरोध

## खासदार, आमदारांशी आपले वैयक्तिक भांडण नाही पण त्यांच्या गर्विष्ठ व अहंकारी वृत्तीशी भांडण : आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर

**फलटण :** पैसा, दहशत आणि प्रशासनाच्या मदतीने राजकारण ताब्यात घेऊन ही मंडळी जिल्ह्यातील कायम दुष्काळी पट्ट्यासह केलेल्या संपूर्ण विकासाचे वाटोळे करतील म्हणून आपला ह्या विकृत व भ्रष्ट बुद्धिमत्तेच्या खासदार, आमदारांना विरोध आहे, या पलीकडे त्यांचे, आमचे व्यक्तिगत कसलेही भांडण नसल्याचे स्पष्ट प्रतिपादन आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी केले.

आगामी लोकसभा पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माढा लोकसभा मतदार संघातील सर्व ६ तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांच्या अनंत मंगल कार्यालय, फलटण येथे आयोजित मेळाव्यात अध्यक्षस्थानावरुन मार्गदर्शन करताना आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर बोलत होते. यावेळी श्रीमंत सुभद्राराजे नाईक निंबाळकर, आ. दिपक चव्हाण, श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, श्रीमंत अनिकेतराजे नाईक निंबाळकर, मुंबई बाजार समितीचे माजी चेअरमन बाळासाहेब सोळसकर, श्रीराम कारखान्याचे माजी चेअरमन महादेवराव पवार, प्रा. अर्जुन खाडे सर, सुरेंद्र गुदगे, मनोज पोळ, सातारा जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सुभाष नरळे सर आणि माणिकराव सोनवलकर, महानंदचे माजी व्हा. चेअरमन डी. के. पवार, माजी सभापती शंकरराव माडकर, सौ. रेश्मा भोसले, सौ. लतिका अनपट, सौ. प्रतिभा धुमाळ, राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष जयकुमार इंगळे, प्रमोद निंबाळकर, खंडाळा पंचायत समिती माजी सभापती रमेश धायगुडे, रमेश शिंदे, रमेश पाटील, विकास साळुंखे, नंदकुमार मोरे, खटावचे माजी सभापती पिंटू पैलवान, धैर्यशील उर्फ दत्ता अनपट, प्रा. बंडा गोडसे, मंगेश धुमाळ, श्रीराम कारखान्याचे चेअरमन डॉ. बाळासाहेब शेंडे, दूध पुरवठा संघाचे चेअरमन धनंजय पवार, विश्वास दादा गावडे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी/कार्यकर्ते उपस्थित होते.

**केलेल्या कामाबाबत न बोलण्याची शिकवण**

केलेल्या कामासंबंधी न बोलण्याची पद्धत आम्ही आजोबा श्रीमंत मालोजीराजे राजेसाहेब यांच्या पासून स्वीकारली असल्याने त्याबाबत आम्ही फारसे बोलत नाही, तथापि उदाहरण म्हणून सांगायचे तर सर विश्र्वेश्वरय्या आणि महाराज साहेब यांची ओळख नसती तर तत्कालीन ब्रिटीश सरकारने नीरा उजवा कालवा या भागातून नेला असता का ? आणि फलटण माळशिरस तालुके अगदी पंढरपूर पर्यंत बागायत क्षेत्र झाले असते का ? असा सवाल यावेळी आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी उपस्थित केला.

**संजीवराजेंना नाही तर तुम्हालाही नाही**

खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर हे चुकून निवडून आले असून सातारा जिल्हा व माढ्याला लागलेले ते एक गालबोट आहे. फलटण - कोरेगाव विधानसभा मतदार संघाप्रमाणे संपूर्ण माढा लोकसभा मतदार संघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कुठल्याही परिस्थितीत श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर यांनाच दिल्लीला पाठवू असा निर्धार सर्वांनी करावा असे आवाहन करतानाच जर श्रीमंत संजीवराजे यांना महायुतीची उमेदवारी मिळाली नाही तर, काहीही झाले तरी खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनाही उमेदवारी मिळू देणार नसल्याचा इशारा महाराष्ट्र विधान परिषद माजी सभापती व विद्यमान सदस्य आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी दिला आहे.



**मनमोकळे बोलण्यासाठी फोटो नाहीत**

पंतप्रधान मोदी यांच्या सारख्या तपस्वी माणसाच्या नावाखाली इथे जे धंदे चाललेत ते त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचे काम आपल्याला या सभेद्वारे करायचे आहे, आम्हालाही मनमोकळेपणाने बोलायचे होते म्हणूनच आम्ही बॅनरवर कोणाचेही फोटो लावले नसल्याचे आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

### ? तर बागायती पट्ट्यातील ३६ गावांचे काय

**खासदार झाल्यावर त्यांनी राज्य शासनाच्या माध्यमातून पहिला जीआर काढला नीरा - देवघरचे पाणी हे वीर धरणातून फक्त नीरा - देवघरच्या लाभ क्षेत्रात द्या, परंतू त्यावेळी आपण मोर्चा काढल्यामुळे ते थांबले याची आठवण करुन देत जर नीरा - देवघरच्या लाभक्षेत्रात हे पाणी दिले गेले असते तर नीरा उजवा कालव्याच्या लाभक्षेत्रात येणाऱ्या फलटण तालुक्यातील छत्तीस गावांना हे पाणी मिळाले असते का ? असा सवाल करताना एवढा या पाणीदार खासदारांचा पाण्याचा अभ्यास आणि ज्ञान असल्याची खोचक टीका यावेळी आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी केली.**

**धरणे उभी राहिली म्हणून काळजला भूमिपूजन**

जिहे - कटापूरच्या योजनेच्या कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार आहेत, परंतू त्यामध्ये यांचे कर्तृत्व काय ?

कृष्णा खोऱ्यातील कोणताही प्रकल्प घ्या, त्याचा पाया मीच घातला आहे, सातारा जिल्ह्यात केवळ धोम व कोयना ही धरणे होती आज सातारा जिल्ह्यातील धरणे किती मोजा असे सांगत त्यावेळी प्रकल्पग्रस्त आणि श्री. छ. स्व. अभयसिंहराजे भोसले, ना. विक्रमसिंह पाटणकर वगैरेनी साथ केली म्हणून केवळ सातारा नव्हे सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे जिल्ह्यातील धरणे उभी राहिल्याचे आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी स्पष्ट केले आणि नीरा - देवघर त्यावेळी उभे राहिले नसते तर कालव्याचे भूमिपूजन काळजला घेता आले असते का असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

### गेली ५ वर्षे सोसले, आता पुन्हा नको

**माढा लोकसभा मतदार संघातील सर्व ६ तालुक्यात गेली ५ वर्षे जे सोसावे लागले ते आगामी ५ वर्षात पुन्हा सोसावे लागू नये, विकासाच्या केवळ गप्पा, प्रत्यक्षात उभ्या राहिलेल्या विकास कामांचा खेळ खंडोबा, आणि सर्वसामान्यांच्या हाल अपेष्टा हे चित्र पुन्हा पहायला, अनुभवायला लागू नये म्हणून हा मेळावा घेतल्याचे सांगत यांनी घेतलेला मेळावा, न केलेल्या कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न होता आम्ही गेल्या ३० वर्षात सर्वांगीण विकासात आणि सर्वसामान्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात यशस्वी झालो आहोत, हे कोणालाही नाकारता येणार नाही कारण त्याचा प्रत्यक्ष लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला असल्याचे आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी अनेक उदाहरणे देत निदर्शनास आणून दिले.**

### बारामतीला पाणी गेल्याने आपला ऊस कमी झाला का ?

**आपण बारामतीला पाणी दिले, बारामतीकर चोर आहेत असे खासदार नेहमी म्हणतात, माझा सामना शरद पवारांशी आहे असे म्हणणारांच्या दूध संघाचे जेंव्हा बारा वाजले होते, तेंव्हा त्यांची दूध डेअरी खा. शरद पवार यांनीच वाचविली असल्याचे सांगत त्यांना चोर म्हणायच आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या बंगल्यावर जाऊन म्हणायच माझं काही चुकलंय का ? बारामतीला पाणी गेल्यामुळे फलटणसह माळशिरस तालुक्यातील एक एकर तरी ऊस कमी झालाय का हे मला शेतकऱ्यांनी सांगावे असे सुचवितांना खरिप हंगामामध्ये फलटण माळशिरस तालुके रब्बीचे अशी नोंद असल्याने नीरा उजव्या कालव्यामधून जे पाणी या भागात येते ते हिशेबात धरले जात नसल्याने ते या भागाला अधिकचे मिळतच राहिले आणि जे पाणी कर्नाटक आंध्रला जाणार होत त्यातील पाणी जर बारामतीने नेले तर यांच्या पोटात का दुखतं असा सवाल आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी यावेळी उपस्थित केला. ही यांची पाणी प्रश्नाची माहिती आणि पाण्याचा अभ्यास असा टोलाही आ. श्रीमंत रामराजे यांनी लगावला.**